इस्लामी संस्कृतीची रूपरेखा*

कौशिक

इस्लामचा उदय आणि त्याचा विकास ह्या घटना इतिहासाच्या प्रकाशझोतात घडून आल्या आहेत. वैदिक धर्म किंवा झोरोस्टियन धर्म यांचा प्रारंभ जसा प्राक्-इतिहासाच्या धूसर संधिप्रकाशात अर्धवट दडलेला आहे तसे इस्लामचे नाही. ह्या धर्माचा विकास एका पृथगात्म अशा संस्कृतीत झाला. ही संस्कृती उत्क्रांत होत असताना तिने परक्या सांस्कृतिक परंपरा आत्मसात केल्या, काही प्रमाणात त्यांच्यात बदल केले व पुढे त्यांतील काही वर्ज्य केल्या. भिन्न संस्कृतींची परस्परांवर क्रिया-प्रतिक्रिया होणे, त्यातून सांस्कृतिक परिवर्तन घडून येणे, एका संस्कृतीचा दुसऱ्या संस्कृतीवर प्रभाव पडणे ह्या मानवी इतिहासात सदैव चालत असलेल्या प्रक्रियांची काही स्पष्ट आणि महत्त्वपूर्ण उदाहरणे, सातवे ते बारावे शतक ह्या कालखंडात इस्लामी संस्कृतीचा जो विकास झाला त्याच्यात आढळून येतात.

इस्लामी संस्कृती हा एका मूलभूत प्रेरणेचा आविष्कार आहे असे म्हणता येईल. ईश्वर, विश्व आणि माणूस यांची स्वरूपे आणि त्यांचे परस्परसंबंध ह्यांविषयीच्या सिद्धांतांची एक संपूर्ण व्यवस्था हे ह्या आविष्काराचे एक अंग आहे. ह्या व्यवस्थेच्या चौकटीत आदर्श मानवी जीवनाचे जे चित्र इस्लामने सिद्ध केले आहे ते ह्या आविष्काराचे दुसरे अंग होय. ह्या दोन अंगांची एकमेकांपासून फारकत करता येणार नाही. एक सिद्धांतप्रणाली आणि तिच्यावर आधारलेली आदर्श जीवनपद्धती ह्या दोन्ही अंगांद्वारा इस्लामची श्रद्धा साकारली जाते.

ख्रिस्ती धर्माप्रमाणे इस्लाम हा प्रकटित (रिव्हील्ड) धर्म आहे आणि ज्या व्यक्तीद्वारे हे प्रकटन झाले तिला, म्हणजे महंमद पैगंबर यांना इस्लामी श्रद्धेमध्ये मूलभूत असे स्थान आहे. ह्या बाबतीतही ख्रिस्ती धर्म आणि इस्लाम यांच्यामध्ये साम्य आहे. महंमद पैगंबरांनी जो संदेश प्रकट केला त्याच्यावर श्रद्धा ठेवणे पुरेसे नाही. ईश्वराने अखेरचे प्रेषित म्हणून महंमद यांची निवड केली ही अर्थपूर्ण गोष्ट आहे अशीही श्रद्धा बाळगणे आवश्यक आहे. ' मी अशी श्रद्धा बाळगतो की ईश्वराशिवाय (अल्ला) अन्य कुणी देव नाही आणि महंमद हे ईश्वराचे प्रेषित आहेत ' ह्या ब्रीदवाक्यात इस्लामी श्रद्धेचा गाभा व्यक्त झाला आहे.

महंमद स्वतःला केवळ एक माणूस मानतात. कोणत्याही स्वरूपाचे देवत्व आपल्या ठिकाणी आहे असा त्यांचा दावा नाही. तुम्ही प्रेषित आहात तर आपले प्रेषितत्व सिद्ध करण्यासाठी चमत्कार करून दाखवा असा आग्रह झाला असता कुराण हा ग्रंथ हाच माझा चमत्कार आहे असे ते म्हणत. हा चमत्कार त्यांनी केलेला आहे ह्याचा अर्थ एवढाच की कुराण त्यांना प्रकट झाले आणि त्यांच्याकरवी इतरांसाठी प्रकट झाले. ईश्वराकडून त्यांना जे साक्षात संदेश येत ते सोडले तर इतर बाबतीत त्यांचे विचार किंवा कृती, इतर माणसांचे विचार आणि कृती यांच्याप्रमाणेच प्रमादशील असण्याची नेहमीच शक्यता असे. श्रद्धाळू मुसलमानांसाठी आपण आदर्श घालून दिला आहे आणि ह्या आदर्शानुसार जगण्याचा त्यांनी प्रयत्न केला पाहिजे असे त्यांनी स्वतः कधी मानले नाही. पण हळूहळू, काल उलटत गेला तसा त्यांचे जीवन हे आदर्श जीवन होते आणि मानवी आणि अतिमानवी परिपूर्णतेचे सार त्यांच्या व्यक्तित्वात प्रतिबिंबित झाले होते असे मानण्यात येऊ लागले. वेगवेगळ्या युगांनी आपापल्या आकांक्षांना आणि आदर्शांना अनुसरून त्यांना वेगवेगळ्या स्वरूपांत पाहिले : एकाला ते इंद्रियदमन करणारे महान योगी भासले, दुसऱ्याला ते साक्षात्कारी संत म्हणून दिसले, तर कुणाला ते गूढवेत्ते.

---

* ह्या लेख जी. ई. फॉन ग्रुनबाउम यांच्या ' धि प्रोफिल ऑफ् मुस्लिम सिव्हिलिझेशन ' ह्या लेखावर आधारलेला आहे. हा लेख ' इस्लाम ' ह्या त्यांच्या लेखसंग्रहात समाविष्ट आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

ईश्वराचा संदेश एकच आणि सार्वत्रिक असतो. पण वेगवेगळ्या जनसमूहांना किंवा जमातींना, तो वेगवेगळ्या काळांत, भिन्न संदेशवाहकांकडून पोचविला जातो. ईश्वराचा संपूर्ण संदेश एका आदिग्रंथात समाविष्ट झालेला आहे आणि त्याचा काही भाग प्रत्येक संदेशवाहकाकरवी किंवा प्रेषिताकरवी, त्याच्या आणि त्याच्या जमातीच्या भाषेत, त्या जमातीसाठी प्रकट करण्यात येतो. भूतकाळात असे अनेक प्रेषित होऊन गेलेले आहेत. इस्लामी परंपरेप्रमाणे त्यांची संख्या १ लक्ष २४ हजार इतकी आहे. पण महंमद पैगंबरांकरवी अंतिम आणि परिपूर्ण असा ईश्वरी संदेश प्रकट झाला आहे. येथे ईश्वरी प्रकटन समाप्त झाले आहे. मोझेस आणि जीझस हे महंमदांचे पूर्वसूरी होते आणि महंमदांना प्राप्त झालेल्या संदेशाचे ह्या पूर्वसूरींनी प्रकट केलेल्या संदेशांशी जे साम्य होते त्याच्या आधारावर आपलाही संदेश प्रमाण आहे असे महंमद मानीत. पण आपल्या धर्मग्रंथांचे जे सार आहे तेच महंमदांनी प्रकट केलेल्या संदेशात आढळते असे यहुदी आणि ख्रिस्ती मानीत नाहीत असे जेव्हा महंमदांना आढळून आले तेव्हा त्यांना विषाद वाटला. यहुद्यांनी आणि ख्रिस्त्यांनी त्यांना लाभलेला मूळ संदेश भ्रष्ट केला आहे, त्यात त्यांनी अनेक असत्यांची भर घातली आहे आणि आब्राहमला जो धर्म ईश्वराने सांगितला त्याची त्याच्या शुद्ध स्वरूपात पुनःस्थापना करण्यासाठी आपल्याला जगात पाठविण्यात आले आहे अशी त्यांची खात्री झाली. आब्राहमचे आणि अरबांचे नाते असे की आब्राहम हा इस्माइलचा पिता आणि इस्माइल हा अरबांचा पूर्वज. प्रेपिताचे अनुयायी त्याचा मूळ संदेश भ्रष्ट करतात अशी एक कल्पना होती. कुराण हा ग्रंथ अविकृत स्वरूपात उपलब्ध असल्यामुळे महंमदांचा संदेश भ्रष्ट होण्याला अवसर नाही.

इसवी सनाच्या ६ व्या शतकात अरबी जमातींमध्ये धार्मिक परिवर्तनाला प्रारंभ झाला होता असे आढळून येते. परंपरेने अरबी टोळ्या अनेक देवतांची उपासना करीत, त्या मूर्तिपूजक होत्या. त्यांच्या धार्मिक कल्पना प्राथमिक स्वरूपाच्या होत्या. मक्का हे एक प्रमुख शहर होते. व्यापारामुळे ते भरभराटीला आले होते. यहुदी आणि ख्रिस्ती यांच्या मोठ्या वसत्या मक्केमध्ये होत्या आणि त्यांच्या धार्मिक कल्पनांचा मक्केच्या रहिवाश्यांना परिचय झाला होता. आपल्या पारंपरिक धार्मिक समजुतीच्या जागी अधिक शुद्ध, बौद्धिक दृष्ट्या अधिक प्रगल्भ आणि सकस अशा श्रद्धेच्या शोधात अनेकजण होते. ऐहिक जीवनाच्या पलीकडे असलेल्या पारलौकिक अस्तित्वाच्या जाणिवेचा उदय झाला होता आणि ही जाणीव उत्कट होऊ लागली होती. महंमदांची जी पहिली उत्स्फूर्त वचने आहेत त्यांच्यात जगाच्या अंताविषयीचे भय, ईश्वरी निवाड्याच्या दिवशी न्यायपीठासमोर उभे राहावे लागेल तेव्हा चित्ताचा होणारा थरकाप ह्यांचाच प्रामुख्याने आविष्कार झालेला आहे. केवळ दगड किंवा लाकडे असलेले हे देव सोडून देऊया, स्वर्ग आणि जग ह्यांचा निर्माता आणि प्रभू असलेला असा एकमेव ईश्वर आहे ह्या सत्याला कवटाळूया आणि मग अंतिम निर्णयाच्या दिवसाच्या घोर भीतीपासून आणि चिरंतन नरकवासाच्या शिक्षेपासून आपली सुटका होईल असा त्यांचा आशय आहे. पापाची जाणीव माणसांना होत होती. आपण दुष्कृत्ये करतो ह्याची एक नवी भीती त्यांना वाटू लागली होती. नरकातील अग्नीच्या भडकत्या ज्वाळा त्यांना दिसू लागल्या होत्या. त्यांच्यापासून त्यांना संरक्षण हवे होते आणि हे संरक्षण महंमदांनी देऊ केले.

ख्रिस्ती कल्पना वेगळी होती. ॲडमने केलेल्या आज्ञाभंगाच्या पातकामुळे माणसाचे पतन झाले आहे आणि त्याचा परिणाम म्हणून माणसाची प्रकृतीच भ्रष्ट झाली आहे. हे मूळ धुवून काढल्याशिवाय माणूस तारला जाणार नाही. त्याची मूळ निरागस, निरामय प्रकृती त्याला परत प्राप्त होणे म्हणजे माणसाचे तारण होणे होय. ईश्वर माणूस म्हणून जगात अवतरतो, माणसासाठी स्वतःचा बळी देतो आणि ह्या आत्मबलिदानाने माणसाचे पाप धुवून काढले जाते, माणसाचे तारण होते. अशा मूळ पापाची आणि त्याच्यापासून माणसाचे जे तारण साधायचे आहे त्याची कल्पना इस्लाममध्ये नाही. माणूस स्खलनशील आहे खरा. पण स्खलन आणि त्याच्यामुळे ओढवणारी शिक्षा माणसाला टाळता येतील. ह्यासाठी खऱ्या ईश्वराचे ज्ञान हवे आणि माणसाने कसे वागावे ह्याविषयीचे जे आदेश त्याने दिले आहेत त्यांचे ज्ञान हवे. ह्या आदेशांना अनुसरून जो जगेल तो स्वर्गाला जाईल. त्यांचा भंग जो करील तो नरकाला जाईल. स्वर्गसुख साधायचा आणि नरकवास टाळायचा जो मार्ग आहे तो पैगंबरांनी प्रकट

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

केला. स्वर्गसुख कसे साधावे ह्याचे तंत्रज्ञान त्यांनी प्रकट केले असे म्हणता येईल. आपल्या प्रकृतीत भिनलेल्या पापाची यातनामय जाणीव, हे पाप धुवून काढून परत निरामय होण्याची तळमळ, माणसाच्या प्रेमाने त्याच्यासाठी यातना भोगणारा देव ह्या ख्रिस्ती जाणीवा इस्लामला परक्या आहेत.

जगाचा अंत जवळ आला आहे अशी जाणीव महंमदांच्या प्रारंभीच्या उत्स्फूर्त वचनांत होती. ख्रिस्त आणि त्याचे अनुयायी ह्यांचाही असाच विश्वास होता. ख्रिस्ताच्या अनुयायांनी ही समजूत काही दशकांनंतर सोडून दिली असे दिसते. महंमदांच्या नंतरच्या वक्तव्यातून ही जाणीव विरल होत गेल्याचे अनुभवाला येते. जर ईश्वर काही काळ जग टिकवून धरणार असेल तर महंमदांच्या श्रद्धाळू अनुयायांच्या जमातीची जगात स्थापना करून ईश्वराने जे आदेश प्रेषिताकरवी प्रकट केले होते त्याचे तंतोतंत पालन करणाऱ्या सामूहिक जीवनमार्गाची स्पष्ट आखणी करणे आवश्यक होते. इस्लाम ही अशी ईश्वराच्या आधिपत्याखाली अनुसरली जाणारी जीवनसरणी आहे. गर्भधारणेपासून तो दफनापर्यंतच्या मानवी जीवनाच्या सर्व अवस्था ह्या जीवनसरणीने नियमित केल्या आहेत. जीवनाचे धार्मिक किंवा पारलौकिक क्षेत्र आणि ऐहिक क्षेत्र असा भेद ती मानत नाही. जीवनाचा बारीकसारीक तपशीलही धर्माशी संबंधित असतो. प्रत्येक कृती हा धार्मिक विधीच असतो. ह्यामुळे जीवन साचेबंद झाले हे जसे खरे आहे त्याचप्रमाणे अगदी क्षुद्र मानल्या गेलेल्या कृतींनाही धार्मिक प्रतिष्ठा लाभली हेही खरे आहे. व्यक्तीचे जीवन ही ईश्वराने आदिष्ट केलेल्या कृत्यांची मालिका बनली. मुस्लिम समाजालाही हे स्वरूप प्राप्त झाले. इस्लामच्या सुरुवातीच्या अनुयायांच्या दृष्टीने राज्य हे ईश्वराचे राज्य होते, सैन्य ईश्वराचे सैन्य होते, खजिना ईश्वराचा खजिना होता.

तेव्हा इस्लामची प्रेरणा ही योग्य, सम्यक अशा जीवनमार्गाचा शोध घेण्याची प्रेरणा होती. ह्या जीवनमार्गात अंतर्भूत असलेले आदेश आणि ऐहिक जीवनातील गरजांची निकड ह्यांच्यामधील संघर्षात इस्लामच्या आंतरिक इतिहासाचे सूत्र आढळते. ह्या आदर्श जीवनसरणीला सुव्यवस्थित रूप देणे आणि तिची अंमलबजावणी करणे ही धर्मशास्त्राच्या भाष्यकारांची जबाबदारी होती. ती त्यांची मक्तेदारीही बनली. ह्या जीवनसरणीला त्यांनी अधिकाधिक संकुचित रूप दिले. ह्याच्यामागे आपल्याकडून चुकीचा आदेश दिला जाऊ नये अशी काळजीही होती. पण ह्याचा परिणाम असा झाला की मध्ययुगाच्या उत्तर काळात इस्लामी समाजाचे प्रत्यक्ष स्वरूप आणि आदर्श इस्लामी जीवनसरणी ह्यांच्यातील दरी झाकण्याचे प्रयत्न अटळपणे करावे लागले; कल्पना आणि वस्तुस्थिती ह्यांच्यात मेळ उरला नाही. कोणत्याही समाजात हे द्वंद्व अपरिहार्यपणे असते. इस्लामी समाजाच्या नंतरच्या इतिहासात हे द्वंद्व अधिकच प्रखर स्वरूपात दृग्गोचर होते.

बौद्धिक सिद्धांतांपेक्षा आचरणाला इस्लाममध्ये अधिक महत्त्व आहे हे त्याच्या पाच आधारस्तंभांवरून स्पष्ट होते. प्रत्येक मुस्लिम व्यक्तीवर बंधनकारक असलेले हे पाच मूलभूत आदेश आहेत. पैगंबरांनी असे म्हटले आहे (असे मानण्यात येते) की " इस्लामची उभारणी पाच गोष्टींवर झाली आहे : ईश्वराशिवाय (अल्लाशिवाय) देव नाही आणि महंमद हे त्याचे प्रेषित आहेत; प्रार्थना; जकात; मक्केची यात्रा आणि रमझानाचा उपवास. "

सम्यक जीवनमार्गाने जगणे हे आयुष्याचे मूलभूत प्रयोजन जर साधायचे असेल तर ह्या जीवनमार्गाचे माणसाला अधिकृत असे ज्ञान उपलब्ध असले पाहिजे. मानवी बुद्धी स्खलनशील असते. तेव्हा संशयातीतपणे सत्य असलेले सिद्धांत आणि बंधनकारक कर्तव्ये ह्यांच्याविषयीच्या आपल्या ज्ञानाचा उगम अतिमानवी असला पाहिजे. प्रत्येक नियम हा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे ईश्वराने घालून दिलेला नियम असला पाहिजे. कुराण म्हणजे महंमदांना जी प्रकटने प्राप्त झाली होती त्यांचा संग्रह. हे ईश्वराचेच महंमदांना उद्देशून केलेले बोलणे आहे. तेव्हा जीवनाचे नियमन करण्याचा सर्वोच्च अधिकार कुराणाचा आहे. मुसलमानांच्या दृष्टीने कुराण सर्व गोष्टींना स्पर्श करते पण धार्मिक श्रद्धा, कायदे आणि पूर्वीच्या प्रेषितांचा इतिहास हे त्याचे खास विषय आहेत. कुराण हा पहिला अरबी ग्रंथ आहे. त्याची रचना सयमक गद्यात केलेली आहे. वृत्ताचे बंधन त्याच्या भाषेला नसले तरी तिला ताल आहे. खलिफा उथमान यांनी कुराणाची जी अधिकृत आवृत्ती प्रसिद्ध केली तिच्या ११४ सुरा (विभाग) आहेत. त्यांचा क्रम त्यांच्या लांबीला अनुसरून लावलेला आहे. जीवनाच्या पारलौकिक अंगाविषयीच्या सुरा अतिशय सुंदर आहेत.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

्या स्वरूपाचे विचार अरबी भाषेत पूर्वी मांडण्यात आले नव्हते ते व्यक्त करताना महंमदांना अनेक नवीन भाषिक प्रयोग घडवावे लागले. कायद्यांची मांडणी करताना कुराणातील भाषा काहीशी क्लिष्ट व बोजड बनते. नंतरचे अरबी ग्रंथकार घटनांचे कथन अतिशय नेमकेपणे व सफाईदारपणे करतात. त्यांच्याशी तुलना करता, पूर्वीच्या प्रेषितांच्या गुंतागुंतीच्या घटनांनी भरलेल्या कथा सांगण्यासाठी महंमदांनी जे कथनतंत्र वापरले आहे ते सदोष वाटते. परंतु मुसलमानांच्या दृष्टीने कुराण हा ईश्वरांचा शब्द आहे. तेव्हा भाषासौष्ठवाच्या दृष्टीनेही तो अतुलनीय आहे. कुराणाच्या भाषेला तोड असू शकत नाही. कुराणाच्या भाषेची ही जी अनन्य-साधारणता आहे तिच्या वैशिष्ट्याचे आकलन आणि उलगडा करण्याच्या प्रयत्नांतून अरबी साहित्यशास्त्राला चालना मिळाली. कुराणात जे शब्द वापरले आहेत त्यांची व्युत्पत्ती समजून घेऊन त्यांच्या अर्थाचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे याविषयी मुसलमानांत एकवाक्यता आहे. पण ह्याच्यापुढे जाऊन कुराणातील वाक्यांच्या अर्थावर भाष्य करणे कितपत आवश्यक आहे ह्याविषयी त्यांच्यात मतभेद आहे.

पण कुराणात अंतिम सत्य प्रकट झाले आहे. तेव्हा आपला वैयक्तिक दृष्टिकोण किंवा आपल्या पंथाचा दृष्टिकोण आणि कुराणातील विधाने ह्यांच्यात संवाद साधणे अत्यावश्यक आहे. ह्या गरजेतून कुराणावर अनेक तत्त्वज्ञानात्मक, गूढवादी, विशिष्ट पंथाच्या सिद्धांतांचे समर्थन करणारी अशी भाष्ये अटळपणे रचण्यात आली आहेत. जेव्हा कुराणातील वाक्यांचा सरळ शाब्दिक अर्थ ह्या कामी उपयोगी पडत नाही तेव्हा अर्थात लाक्षणिक अर्थाची कास धरण्यात येते.

कुराणाचा कितीही लवचिकपणे अर्थ लावला तरी प्रत्येक धार्मिक प्रश्नाचे उत्तर कुराणात सापडेल हे संभवत नाही. ह्यासाठी 'सुन्नेचा आश्रय घ्यावा लागतो. 'सुन्ना' म्हणजे प्रेषितांची वचने आणि कृती यांच्याविषयीच्या परंपरा. जीवनाचे नियमन करण्याचा सुन्नेचा अधिकार कुराणाच्या खालोखालचा आहे. जर कुराणात एखाद्या गोष्टीविषयी काही वचन नसेल तर प्रेषितांचे खाजगी वचन किंवा त्यांच्या कृतिविषयीचे एखाद्या समकालीनाने केलेले निवेदन त्या बाबतीत निर्णायक ठरते. मुसलमान जमातीच्या जाणीवेत हळूहळू महंमदांच्या स्वरूपाचे रूपांतर घडून आले. ईश्वराचा केवळ मानवी असलेला प्रेषित किंवा संदेशवाहक हे मूळचे स्वरूप होते. महंमद हा अलौकिक, दैवी शक्तीने संपन्न असलेला पुरुष आहे अशा श्रद्धेने घेतली. ह्यामुळे आपापल्या पंथाच्या मतांचे समर्थन करणारी, पुढे होणाऱ्या ऐतिहासिक घटनांचे भविष्य वर्तवणारी आणि साधारणपणे मुस्लिम जमातीच्या त्या त्या वेळच्या भावना प्रतिबिंबित करणारी वचने प्रेषितांच्या तोंडी घालणे अधिक सोपे झाले. जमातीच्या दृष्टीने सुन्नेला एवढे महत्त्व आले की प्रसंगी कुराणांतील स्पष्ट वचनेही सुन्नेच्या अधिकारामुळे बाजूला सारण्यात आली. कुराण आणि सुन्ना ह्यांच्या खालोखाल इज्माचा अधिकार आहे. इज्मा म्हणजे मुसलमान जमातीची सममती (कॉन्सेन्सस). 'माझ्या जमातीची कोणत्याही भ्रामक समजुतीविषयी एकवाक्यता होणार नाही' असे प्रेषितांचे एक वचन आहे आणि त्याच्यावर इज्माचा अधिकार आधारलेला आहे. इज्मा हा बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याचा मार्ग आहे आणि सुन्ना हाही वस्तुतः ह्याच स्वरूपाचा दुसरा मार्ग आहे. धर्मशास्त्रज्ञांची सममती (इज्मा) नवीन काय करावे हे सांगत नाही पण जी प्रथा किंवा समजूत रूढ झाली आहे तिला मान्यता देते. ह्यामुळे संतांच्या संप्रदायासारख्या इस्लामविरोधी गोष्टींना इस्लाममध्ये स्थान देणे शक्य झाले. रूढ व्यवहार आणि इस्लामी आदर्श ह्यांच्यामधील तफावतीला मर्यादा घालता आली.

तथापि इस्लाम परंपरावादी आहे. ज्या उदाहरणांचा आदर्श म्हणून अनुकरण करण्यासाठी स्वीकार करायचा ती प्राचीनतम काळातील उदाहरणे असतात. महंमदाच्या प्रारंभीच्या अनुयायांची पिढी ही सर्वोत्कृष्ट पिढी होय. त्यांच्यानंतरची पिढी तिच्या खालोखाल चांगली. त्यानंतर जग बिघडत चालले आहे आणि त्याचा पूर्वनिर्णित अंत होईपर्यंत ते बिघडत जाणार. आजच्या पिढीला ज्या प्रथा वारसा म्हणून लाभलेल्या आहेत त्यांच्यात बदल करण्याचा तिला अधिकार नाही; कारण बदलामुळे अधिक बिघाड होणार. धार्मिक बाबतीत कोणतीही नवीन गोष्ट प्रविष्ट करण्याचा कुणालाही अधिकार नाही. नवीन गोष्ट त्याज्यच असणार. जो धर्मात काही नवीन गोष्ट आणतो तो शिक्षेला पात्र असतो. तेव्हा धर्मसुधारक आपल्या सुधारणेचे समर्थन करताना नेहमी प्रेषितांच्या वचनाचा किंवा कुराणातील उक्तीचा आधार घेतो. इस्लामचे प्रारंभीचे जे सुवर्णयुग होते त्याच्याकडे परतणे हेच आपल्या सुधारणेचे उद्दिष्ट आहे अशी त्याची भूमिका असते.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

जी मूळ प्रथा होती ती आपल्याला बाजूला सारायची नाही किंवा तिच्यात बदलही करायचा नाही; फक्त तिच्यात ज्या गोष्टी मागाहून घुसल्या आहेत किंवा ज्या विकृती शिरल्या आहेत त्या काढून टाकायच्या आहेत असे त्याचे म्हणणे असते. अलौकिक पुरुषांचे, सर्जनाचे युग मागे पडले आहे. ही वृत्ती केवळ धार्मिक बाबतीतच आढळून येते असे नाही. अरबी काव्याची जी इस्लामपूर्व परंपरा होती तिच्या मर्यादांत सर्व काव्य सामावून घेण्यासाठी साहित्यशास्त्रज्ञ प्रयत्नांची शर्थ करतात. साहित्याने नवीन परिस्थितीशी जुळवून घ्यावे, नवीन भावनांचा आविष्कार करावा ह्याला ते प्रतिबंध करतात. हे प्रयत्न यशस्वी ठरत नाहीत ही गोष्ट वेगळी. फक्त ९ व्या आणि १० व्या शतकांत बौद्धिक जगामध्ये यौवनाची ऊर्मी आढळून येते. प्राचीनांची बरोबरी आपण करू किंवा त्यांच्याहून सरस ठरू असा उत्साह तेव्हा वातावरणात होता. आफ्रिकेमध्ये जी फातिमिड राजवट स्थापन झाली तिने आपल्या प्रचारात आपला राजवंश तरुण आहे; बगदादच्या आबासीद घराण्यासारखा वृद्धत्वाने जर्जर झालेला नाही ह्या गोष्टीवर भर दिला होता. पण सर्वजण ह्या आत्मविश्वासात सहभागी होते असे नाही. अकराव्या शतकात तो मावळूही लागला. जीवनाचे नियमन करणारे आदर्श भूतकाळात शोधण्याची जी सर्वसाधारण वृत्ती होती तिच्यावर त्याचा फारसा प्रभाव पडला नाही.

परंपरेचा अधिकार सुदृढ करण्यासाठी व्यक्तीच्या स्वतंत्र विचारांना प्रतिबंध करावा लागतो. प्रेषितांची बनावट वचने वाढू लागली आणि हळूहळू त्यांचा महापूर लोटल्यासारखे झाले. ह्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी अस्सल वचनांपासून नकली वचने बाजूला काढणे जमातीला भाग पडले. ह्यासाठी वचनांच्या आशयाचे विश्लेषण करण्याची पद्धती अवलंबिण्यात आली नाही; तर एखाद्या वचनाचा जो शेवटचा निवेदक असेल त्याला आणि प्रेषितांना जोडणारी विश्वसनीय साक्षीदारांची अखंड साखळी आहे की नाही ह्याचा अभ्यास संग्राहकांनी केला. ह्यामुळे चरित्रलेखनाला बहर आला. अरबी भाषेमध्ये व्यक्तींची जितकी अभ्यासपूर्वक चरित्रे लिहिली गेली आहेत तितकी अलीकडच्या काळापर्यंत पाश्चात्त्य भाषांमध्येही नव्हती. पण ह्यामुळे विद्वानांना बनावट विधाने प्रेषितांच्या मुखात घालायला प्रतिबंध झाला असे घडले नाही. आणि प्रेषितांची जी वचने अस्सल मानली जातात ती आधुनिक मनाला विश्वसनीय म्हणून स्वीकारता येण्यासारखी आहेत असेही नाही.

प्रार्थना हा जो पाच आधारस्तंभांतील एक आधारस्तंभ आहे तो प्रार्थनाविधी आहे; व्यक्तीने ईश्वराची केलेली आळवणी नव्हे, किंवा ईश्वराशी साधलेले मानसिक सायुज्य नव्हे. हा विधी म्हणजे कित्येक विशिष्ट वचनांचा एक गुंतागुंतीचा क्रम आहे. विशिष्ट शारीरिक हालचालींच्या समवेत ही वचने उच्चारली जातात. शरीराच्या अवयवांचे प्रक्षालन केल्यानंतर आणि शरीराचे काही अवयव झाकल्यानंतरच प्रार्थनेला सुरुवात करता येते. दिवसाच्या ठरलेल्या पाच वेळा प्रार्थना केली पाहिजे असा नियम आहे. मशिदीत सर्वांनी मिळून इमामामागे उभे राहून प्रार्थना करणे हे सर्वांत उत्तम. प्रार्थनाविधीच्या सर्व तपशिलाचा धर्मशास्त्रज्ञांनी कसून अभ्यास केला आहे आणि कोणत्या प्रासंगिक परिस्थितीत प्रार्थनाविधी करण्यात आला तरीही तो फोल ठरेल ह्याचा निर्णय करण्याचा प्रयत्न केला आहे. तेव्हा धर्मशास्त्रज्ञांच्या मते प्रार्थनेचे प्रामाण्य बाह्य कृती आणि उद्‌गार हे नियमांना धरून असण्यावर अवलंबून असते. आंतरिक वृत्तीवर ते अवलंबून नसते. गझाली यांच्यासारख्या धार्मिक वृत्तीच्या व्यक्ती अर्थात ह्या मताला विरोध करतात.

ईश्वराची सत्ता निरंकुश आहे ह्या विचाराने इस्लाम भारलेला आहे. ईश्वर एक आहे, तो सर्वशक्तिमान आहे, नैतिक नियमांनी तो जखडलेला नाही, माणसाचे योग्य मार्गदर्शन करण्याचे, त्याच्या आज्ञापालनाबद्दल त्याला पारितोषिक देण्याचे आणि आज्ञाभंगाबद्दल त्याला शिक्षा देण्याचे बंधन त्याच्यावर नाही. माणसाच्या, म्हणजे ईश्वराच्या सर्वश्रेष्ठ निर्मितीच्या असाहाय्य दुबळेपणाच्या विरोधात ईश्वराची महती स्पष्ट होते. निसर्गाचे अनुल्लंघनीय असे नियम आहेत, एक चिरंतन अशी निसर्गव्यवस्था आहे आणि तिचे पालन करायला ईश्वर बांधलेला आहे हे तत्त्व इस्लाम स्वीकारीत नाही. हे तत्त्व नाकारण्याचे खरे कारण त्याच्यात काही संकल्पनात्मक विसंगती आहेत हे नाही. ईश्वराच्या निरंकुश माहात्म्याला कसलीही मर्यादा घालू नये हा विचार त्याच्यामागचे खरे कारण आहे. ईश्वराच्या ह्या माहात्म्याची छाया म्हणून माणसाकडे हीनता येते आणि विश्वाच्या शासनव्यवस्थेत लहरीपणाला स्थान मिळते ह्याची क्षती करण्यात येत नाही. निसर्गात ज्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

घटना घडतात त्यांच्यात काही नियमबद्धता दिसून येते हे खरे. पण ही केवळ ईश्वराची प्रथा आहे. त्याने घालून दिलेल्या वज्रलेप, अनन्यथाकरणीय नियमांचे बंधन सृष्टीवर नाही किंवा त्याच्या स्वतःवर नाही. असे असले तरी एखादा दयाळू सुलतान जसा आपल्या प्रजेला कनवाळूपणे वागवितो, तिच्यावर जो भार असतो तो हलका करण्याचा प्रयत्न करतो, तिच्या वर्तनाकडे क्षमाशील दृष्टीने पाहतो आणि एखाद्याने जरी आगळीक केली असली तरी आपल्याला प्रिय असलेल्या कुणी त्याच्यासाठी रदबदली केली तर ती तो ऐकून घेतो, तसे ईश्वराचे माणसाशी वर्तन असते. ईश्वर आणि माणूस यांच्या संदर्भात अर्थात माणसाच्या वतीने रदबदली करण्याचे कार्य आणि अधिकार प्रेषित महंमदांचा आहे. ईश्वराचा अनुग्रह जेव्हा एखाद्या व्यक्तीवर होतो तेव्हाच ती ईश्वराकडे वळते. आणि हा अनुग्रह कुणावर करायचा आणि कुणावर नाही हा ईश्वराचा निरंकुश असा निर्णय असतो. कुराणात म्हटल्याप्रमाणे, "ईश्वराची इच्छा असेल त्याप्रमाणे तो कुणालाही गैर मार्गाकडे नेतो आणि त्याची इच्छा असेल त्याप्रमाणे तो कुणालाही सन्मार्गावर नेतो. तसेच, "आम्ही अनेक जिन आणि माणसे यांच्यासाठी नरक निर्माण केला आहे."

मुताझिल हे इस्लामच्या सिद्धांतांचे तार्किक विवरण आणि परिष्करण करणारे तत्त्ववेत्ते होते. त्यांचा उदय आठव्या शतकात झाला. सनातन (ऑर्थोडॉक्स) इस्लामची ईश्वराची संकल्पना मानवरूपवादी (अॅन्थ्रापॉमॉर्फिक) होती. तिचा मुताझिलांनी अव्हेर केला. ईश्वर एक आहे हा मूलभूत इस्लामी सिद्धांत आहे. तेव्हा ईश्वराच्या एकतेचा अर्थ अत्यंत तार्किक कठोरतेने लावला पाहिजे असा त्यांचा युक्तिवाद होता. जे जग ईश्वराने निर्माण केले आहे त्याचे अधिकात अधिक कल्याण साधण्याच्या दृष्टीने जे कृत्य सर्वांत अधिक शहाणपणाचे असेल ते ईश्वर नेहमी करतो अशी त्यांची शिकवण होती. तिच्यामुळे अर्थात ईश्वराच्या निरंकुश सार्वभौमत्वाला मर्यादा पडते. मानवी वर्तन आणि ईश्वराची प्रतिक्रिया यांचा नैतिक मेळ घालण्याचा मुताझिलांनी प्रयत्न केला. त्यात मानवाविषयीची एक वेगळी दृष्टी गर्भित आहे. ईश्वर माणसाला न्याय देतो असे आग्रहाने प्रतिपादन करून मानवी प्रतिष्ठेचे ते संरक्षण करीत आहेत. पण सनातनी इस्लामचा दृष्टिकोण ह्याच्या विरुद्ध होता आणि तो त्याने कधी सोडून दिला नाही.

मुसलमानांच्या पहिल्या पिढीची जी धर्मश्रद्धा होती तिच्यावर भीतीचा पगडा होता. त्या काळातील सर्वांत प्रतिभावंत असा संत म्हणजे हसन अल् बसरी हे होत. ते अत्यंत कडक व्रते आणि यमनियम यांचे पालन करीत. 'त्यांची शिकवण आणि उपदेश श्रोत्यांना पश्चात्तापाचे आवाहन करण्याला मुख्यत्वे वाहिलेला असे. ईश्वराचा क्रोध पुढे सहन करावा लागू नये म्हणून माणसाने पश्चात्ताप केला पाहिजे. ह्या क्षणभंगुर जीवनाविषयी आणि ह्या नाश पावणाऱ्या जगात जे काही आहे त्या सर्वांविषयी माणसाने तुच्छतेची वृत्ती धारण केली पाहिजे असा उपदेश ते करीत... एक माणूस एक हजार वर्षे नरकयातना भोगल्यानंतर अखेरीस त्याची मुक्तता होणार आहे असे जेव्हा हसन यांनी ऐकले तेव्हा ते विलाप करू लागले. 'त्या माणसासारखे माझे भाग्य असेल तर किती चांगले होईल' असे उद्गार त्यांनी काढले. माणसाचे ईश्वराशी जे नाते आहे त्याला धर्मशास्त्रज्ञांनी जवळजवळ कायदेशीर संबंधाचे स्वरूप दिले होते. ईश्वराचे अमूक अमूक तपशीलवार आदेश आहेत आणि माणसाने आपल्या सर्व कृत्यांत ह्या आदेशांचे पालन केले पाहिजे असे हे नाते बनले होते. ह्याची प्रतिक्रिया म्हणून ज्यांची धार्मिक श्रद्धा जिवंत होती त्यांनी ईश्वराशी साक्षात संबंध जोडण्याला, त्याच्या सान्निध्यात जगण्याला महत्त्व दिले. ईश्वराची भीती आणि ईश्वराविषयीचा पूज्यभाव ह्यांच्या जोडीने ईश्वरावरचे प्रेम आणि ईश्वरावरील आश्वासक विश्वास ह्या भावनांना त्यांनी ईश्वर-मानवाच्या नात्यात स्थान दिले. ईश्वराची अनन्यपणे आणि शुद्ध भावाने भक्ती केली की भक्त ईश्वराच्या समीप जातो, त्याला ईश्वराचे साक्षात दर्शन होते, ईश्वराच्या अस्तित्वात स्वतःच्या अस्तित्वाला तो अत्यानंदाने बुडवून टाकतो. ईश्वर आणि माणूस यांच्या दरम्यान अनंत दरी आहे अशी धर्मशास्त्रज्ञांची शिकवण आहे. साक्षात्कारी अनुभवाच्या संकल्पनेने ही दरी बुजविण्याचा प्रयत्न गूढवादी भक्तांनी केला. कित्येक गूढवाद्यांनी तर अद्वैतवादाचा आश्रय करून चाकर आणि मालिक यांच्यात तादात्म्याचे नाते प्रस्थापित केले. पण एकंदरीत गूढवाद्यांनी तर्काचा जो आधार घेतला त्याचे उद्दिष्ट सनातनी इस्लामचे जे नियम आणि तत्त्वे आहेत त्यांच्यात आणि गूढानुभवात विसंगती नाही, तसेच

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

प्रेषिताला एकटयाला लाभलेल्या संदेशाद्वारे माणसांना आध्यात्मिक सत्यांचे ज्ञान होते असे मानण्याशी आणि ईश्वराचा साक्षात अनुभव माणसाला येऊ शकतो असे मानणे सुसंगत आहे हे सिद्ध करण्याचे होते. गूढवादी आणि इस्लामचे अधिकृत भाष्यकार ह्यांच्यात सुप्त विरोध होता. गूढवाद्यांच्या भूमिकेत ईश्वर आणि मानव यांच्या स्वरूपाविषयीचे आणि परस्परसंबंधांविषयीचे जे सिद्धांत अध्याहृत होते त्यांचे त्यांनाच यथार्थ आकलन झाले नव्हते. हे सिद्धांत जेव्हा स्पष्ट झाले तेव्हा गूढवादी आणि अधिकृत इस्लाम ह्यांच्यामधील विरोधाला तोंड फुटले.

हे घडण्यापूर्वी गूढवादी निःसंकोचपणे आणि धिटाईने ईश्वराशी जवळीक साधीत. राबिया अल् अडविय्या ह्या संत-कवयित्रीचे पुढील उत्स्फूर्त उद्‌गार पहा—

मी तुझ्यावर दोन प्रकारांनी प्रेम केले, एक स्वार्थी प्रेम
आणि दुसरे तुला साजेसे प्रेम.
स्वार्थी प्रेमात इतर सर्वांना विसरून मी फक्त तुझेच स्मरण करीत राहिले.
जेव्हा मी तुला साजेसे प्रेम केले तेव्हा तू तुझे अवगुंठन दूर केलेस,
तुझे दर्शन मला व्हावे म्हणून
तू माझी आशा, माझा विसावा, माझा आनंद आहेस.
माझे हृदय तुझ्याशिवाय इतर कुणावर प्रेम करू शकत नाही.

गूढवादी सुफींची भूमिका अबू नस्र अस्-सराज ह्यांनी अशी मांडली आहे. "सनातनी मुसलमान आणि धर्मशास्त्रज्ञ जे सिद्धांत स्वीकारतात आणि त्यांनी जी शास्त्रे रचली आहेत ती सुफी मान्य करतात. धार्मिक कायद्यांत ज्या अडचणी उद्‌भवतात त्यांचे निरसन करण्यासाठी सुफीही ह्या शास्त्रांचा आश्रय घेतात. जर शास्त्रांत मतभेद आढळले तर सर्वांत सक्त आणि उत्कृष्ट पर्याय असेल त्याची निवड करावी हे तत्त्व ते स्वीकारतात. ईश्वराच्या आदेशांविषयी ते पूज्यबुद्धी धारण करतात; त्यांतून ते पळवाटा शोधीत नाहीत. सनातनी मुसलमान आणि धर्मशास्त्रज्ञ ह्यांनी जी तर्कबद्ध शास्त्रे रचली आहेत त्यांच्या संबंधातील सुफींचे आचरण असे आहे. पण ही शास्त्रे ते मागे टाकतात आणि गूढवादी भक्ती व नैतिक साधना यांच्या उत्तुंग शिखरावर ते आरूढ होतात; हे केवळ त्यांचे प्रदेश आहेत.

कुराण आणि सुन्ना यांची चर्चा धर्मशास्त्रज्ञ करतात. पण ह्या साहित्यात 'पश्चात्ताप', 'तितिक्षा', 'भीती' आणि 'आशा'.ह्या भावनांचे जे उल्लेख येतात त्यांचा खरा आशय फक्त सुफींना माहीत असतो. कुराण आणि सुन्ना ह्यांच्यातच सर्व सुफी-शिकवण सामावलेली आहे. पण प्रकटनाची ही जी भावनात्मक अंगे आहेत त्यांचा साक्षात अनुभव फक्त सुफींना आलेला असतो. अधिकृत इस्लामच्या सिद्धांतांशी असा समन्वय साधण्याचा प्रयत्न जरी सुफींनी केला तरी सुफींचा गूढवाद आणि इस्लामी धर्मशास्त्र यांत मूलभूत स्वरूपाचा विरोध आहे यात शंका नाही. अनुभव हे आध्यात्मिक जीवनाचे साध्य आणि सार आहे असे मानले तर बाह्य धर्माचरण आणि धर्मशास्त्रातील आदेशांचे पालन ह्यांना खरे धार्मिक महत्त्व उरत नाही. आपल्या भूमिकेपासून निष्पन्न होणारा हा तार्किक निष्कर्ष अनेक सुफींनी काढला. धर्मशास्त्रज्ञांच्या दृष्टीने इस्लामचे सिद्धांत आणि धार्मिक आदेश यांच्याविषयीचे सुफींचे औदासिन्य पाखंडी आणि समाजविरोधीही होते. सुफींच्या दृष्टीने जे गूढ सत्य प्रत्यक्ष अनुभवायचे असते त्याची तार्किक मांडणी करण्याचा खटाटोप व्यर्थ असतो. जलाल अद्दिन रूमी ह्या प्रसिद्ध सुफीने म्हटले आहे—

"हा सिद्धान्त त्या सिद्धान्ताचा प्रतिस्पर्धी आणि कडवट वैरी बनला आहे आणि त्यामुळे अनुकरण करणारा (इतरांची मते स्वीकारणारा) शृंगापत्तीत सापडला आहे.
(संशयवादाच्या) दुष्ट सूचनांची मुस्कटदाबी प्रेमानेच होऊ शकते.

हे (प्रिय) आत्म्या, प्रेमच केवळ विवादाला आळा घालते कारण युक्तिवादाशी मुकाबला करताना जेव्हा तू साहाय्यासाठी हाक देतोस तेव्हा प्रेमच तुझी सुटका करण्यासाठी धावून येते."

श्रद्धावान मुसलमानाच्या सबंध जीवनावर आणि विचारांवर आपला अधिकार आहे असा इस्लामचा दावा आहे. मुसलमान जमात ही इस्लामी श्रद्धेची धारक असते. इस्लामी जीवनसरणी मुसलमान जमातीच्या जीवनसरणीत, कृत्यांत आणि विचारांत मूर्त झालेली असते. ख्रिस्ती समाजात ख्रिस्ती धार्मिक श्रद्धेचा अधिकृत अर्थ लावणारी आणि तिच्या शुद्धतेचे संरक्षण करणारी चर्च ही संस्था असते. मुस्लिम

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

समाजात असे वेगळे चर्च नाही. सबंध मुस्लिम जमात हीच मुस्लिम श्रद्धेची पालक असते. इस्लामी श्रद्धा जीवनव्यापी असल्यामुळे इस्लामी समाजाला राजकीय प्रश्नही धार्मिक पायावर सोडवावे लागतात. इस्लाममध्ये जे पहिले पंथ उदयाला आले त्यांचे मूळ धार्मिक आणि सामाजिक दृष्टिकोणातील खोलपर्यंत पोचलेल्या भिन्नते-मध्ये होते यात शंका नाही. पण त्या काळच्या एकंदर राजकीय परिस्थितीत ह्या पंथांना जमातींचे स्वरूप प्राप्त झाले आणि समग्र मुसलमान जमातींमध्ये उप-जमाती म्हणून त्या नांदू लागल्या. हा पंथ समतावादी होता. धर्माच्या आदेशांचे कडकपणे पालन केले पाहिजे ह्यावर त्याचा भर होता. वैध राज्यकर्त्याच्या अंगी कोणत्या प्रकारची पात्रता असली पाहिजे आणि ही पात्रता एखाद्याच्या अंगी आहे की नाही हे ठरविण्याचा अधिकार कुणाचा असतो ह्या मुद्द्यांवर त्यांचा बहुसंख्य मुसलमानांशी विरोध होता. ह्यातून त्यांचा वेगळा पंथ उभा राहिला. शिया पंथ फुटून निघण्याचे मूळ कारण म्हणजे खलिफा बनण्याचा अधिकार कुणाचा आहे ह्यां-विषयी असलेला मतभेद होय. शियांच्या मते हा अधिकार प्रेषितांचे चुलत बंधू आणि जामात अली यांचा आणि त्यांच्या वंशजांचा होता. अली यांचा मुलगा हुसेन यांचा लढाईत मृत्यू झाल्यानंतर ही शक्यता माव-ळली. इमाम, म्हणजे इस्लामी जमातीचा नेता कोण असावा हा ह्या वादाचा मुद्दा होता. पुढे शियापंथी-यांनी 'इमाम' ह्या संकल्पनेचा विकास करून ईश्वर-विद्येत (थिऑलॉजी) तिला मूलभूत स्थान दिले. ईश्वराचा माणसात आविष्कार होतो हे जुने मत त्यांनी उचलून धरले. (सुन्नी इस्लामप्रमाणे माणूस ही ईश्वराची केवळ निर्मिती आहे आणि ईश्वर आणि माणूस यांच्यात पूर्ण द्वैत आहे.) इमामच्या प्रकृतीत हा ईश्वरी अंश अंतर्भूत असतो– इतर माणसांत नसतो– आणि म्हणून परलोकात चिरंतन सौख्य प्राप्त होण्यासाठी इमामचे मार्गदर्शन आणि मध्यस्थी आवश्यक असते.

सुन्नी मुसलमानांनी राज्याचे कार्यक्षेत्र आणि अधिकार यांच्याविषयी एक मर्यादित संकल्पना घड-विली. सुन्नी राज्य हे कल्याणकारी राज्य नाही. ग्रीक (प्लेटो, ॲरिस्टॉटल) संकल्पनेप्रमाणे प्रजेचे सौख्य हे राज्याचे प्रयोजन असते आणि राज्यात सहभागी होऊन व्यक्ती आपले हित साधत असते. ह्या संकल्पनेहूनही सुन्नी संकल्पना भिन्न आहे. घझालीने तिचे केलेले विवरण असे आहे : धार्मिक जीवन चांगल्या प्रकारे संघटित व्हावे हे ईश्वराचे एक उद्दिष्ट आहे. ज्याचा अधिकार लोक मान्य करतील आणि ज्याच्या आदे-शांचे ते पालन करतील असा इमाम असल्याशिवाय असे संघटन होणे शक्य नाही. कुराण आणि सुन्नी ह्यांच्या अधिष्ठानावर इस्लामी धर्मशास्त्रात जो कायदा सुव्यवस्थित स्वरूपात मांडण्यात आला आहे त्याला अनुसरून प्रजेला जगता यावे अशी व्यवस्था हे इमा-मचे आणि त्याच्या हवाली करण्यात आलेल्या राज्य-संस्थेचे एकमेव कार्य आहे. तेव्हा मुस्लिमेतरांपासून मुस्लिम भूप्रदेशाचे संरक्षण करणे, त्याचा विस्तार करणे आणि आपल्या प्रदेशात मुस्लिम प्रजेला आपली धार्मिक कर्तव्ये निर्वेधपणे पार पाडता यावीत म्हणून कायदा आणि सुव्यवस्था यांची अंमलबजावणी करणे ही इमामची प्रमुख कर्तव्ये होत. महंमद पैगंबर हे मुसलमान जमातीचे नेते होते आणि खलिफाकडे परं-परेने हे नेतृत्व येते. पण महंमद हे प्रेषित होते आणि त्यांनी कायदे घालून दिले. हा अधिकार आणि ही कार्ये खलिफाकडे येत नाहीत. प्रेषितांच्या आदेशांचा अधिकारी धर्मशास्त्रज्ञांनी जो अर्थ लावला आहे त्याला अनुसरून ह्या आदेशांचे पालन होत आहे हे पाहणे हे खलिफाचे काम आहे. पण ह्या आदेशांचा अर्थ लावण्याचा अधिकार खलिफाला नाही. मग ह्या आदे-शांत भर घालण्याची किंवा त्यांतील काही आदेश रद्द करण्याची गोष्ट दूर राहिली. राज्याचा कारभार करताना खलिफा जे हुकूम सोडील ते अर्थात पाळावे लागतील. धर्मशास्त्रात सांगितले आहेत त्यापेक्षा अधिक कर तो प्रत्यक्षात लादेलही. पण हे कृत्य अवैध राहील. धर्मनिष्ठ व्यक्तींनी शासनव्यवहारात, विशेषत: न्याय-दानाच्या कामात गुंतू नये. त्यात धोका असतो. धर्म-शास्त्राच्या कायद्यांना अनुसरून न्याय देणारा अधिकारी म्हणजे काजी. पण अनेकदा असे प्रसंग येतात किंवा अशी परिस्थिती उद्भवते की जिच्या आधारे त्यांच्या-विषयी निर्णय करता येईल अशी तजवीज धर्मशास्त्रा-तील कायद्यांत नसते. तेव्हा हळूहळू इस्लामी देशांत समांतर न्यायदानाची व्यवस्था प्रचलित झाली. धर्म-शास्त्रातील अपरिवर्तनीय कायद्यांचा धर्मशास्त्रज्ञांनी जो अर्थ लावला असेल त्याला अनुसरून न्याय देणारे एक न्यायालय. दुसरे न्यायालय ज्या कायद्याला अनु-सरून न्यायदान करीत असे तो कायदा 'ऐहिक' असे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

उदा., मोंगलांनी इराण जिंकल्यावर तेथे लागू केलेला आपला कायदा किंवा इजिप्त आणि तुर्कस्तान ह्यां देशांत पूर्वापार रूढी आणि राज्यकर्त्यांचे पूर्वीचे निर्णय ह्यांच्यापासून विकसित झालेला कायदा. सर्वसाधारणपणे धर्मशास्त्रातील कायदा वैयक्तिक बाबीपुरता मर्यादित असे. तेव्हा धर्मशास्त्रातील कायदा सामाजिक व वैयक्तिक व्यवहाराच्या सर्व क्षेत्रांना लागू करावा अशी परंपरावादी सुधारकांची नेहमीची एक मागणी असे.

ऐहिक आणि धार्मिक गोष्टी एकमेकांत कशा गुंतलेल्या असत हे अली यांनी सिफिनच्या लढाईपूर्वी आपल्या सैनिकांना उद्देशून केलेल्या भाषणावरून च गल्या प्रकारे दिसून येते.

" स्वतःचे बलिदान करा ! ईश्वराचे डोळे तुमच्याकडे लागून आहेत आणि तुम्ही प्रेषिताच्या चुलतभावासोबत आहात. फिरून हल्ला करा आणि पलायनाचा तिरस्कार करा, कारण त्याचा डाग तुमच्या अपत्यांना लागेल आणि निर्णयाच्या दिवशी तुमच्या वाट्याला अग्नी येईल. तुमच्यासमोर हे प्रशस्त सवाद (इराकच्या फळबागा) आहे आणि हे भले थोरले तंबू आहेत. रक्त भरपूर वाहू द्या. कारण ह्या टेकडीवर सैतान आपले दोन्ही बाहू पसरून उभा आहे. एक बाहू त्याने हल्ला करण्यासाठी पसरला आहे आणि पळून जाण्यासाठी एक पाय त्याने मागे घेतला आहे. तो तेथे पाय रोवून उभा राहिला आहे, सत्य प्रकट होईपर्यंत तो तेथून हलणार नाही. पण तुम्ही ह्या लढाईत विजयी व्हाल; ईश्वर तुमच्या सोबत आहे आणि तुमच्या कृत्याच्या पुण्यापासून तुम्हाला तो वंचित होऊ देणार नाही.

सुन्नी राज्यकर्त्यांप्रमाणे शिया इमाम हे केवळ राजकीय सत्ताधीश नाहीत. त्यांचे एक विशिष्ट आध्यात्मिक कार्य आहे. ते ईश्वर आणि माणूस यांच्यामधील मध्यस्थ किंवा दुवा आहेत. त्यांनी रदबदली केल्याशिवाय माणसाला ईश्वरदत्त शिक्षा टाळता येणार नाही. माणसाला आध्यात्मिक जीवनात नेहमी मार्गदर्शनाची आवश्यकता असते आणि निष्पाप अशा इमामशिवाय कुणी माणूस मार्गदर्शन करू शकत नाही. इमामला कायदे करण्याचा विशेषाधिकार असतो हेही ह्यापासून निष्पन्न होते. पण इमाम प्रत्यक्षात सत्ताधारी असला पाहिजे किंवा जगात दृश्य स्वरूपात वसत असला पाहिजे असा निष्कर्ष ह्यावरून काढता येणार नाही. बहुसंख्य शियांच्या मते शेवटचे ऐतिहासिक इमाम महंमद अबुल कासीम हे इ. स. ८७९ साली अंतर्धान पावले पण आध्यात्मिक मार्गदर्शनाचे आपले कार्य त्यांनी चालू ठेवले आहे. ईश्वराने ठरविलेल्या वेळी ते पुन्हा अवतीर्ण होतील आणि उघडपणे जगाची सत्ता आपल्या हाती घेतील. आजचे सत्ताधीश हे गुप्त झालेल्या इमामचे केवळ प्रतिनिधी आहेत. १९०६ मध्ये बनविण्यात आलेल्या इराणच्या पहिल्या राज्यघटनेत इराणी संसद ह्या युगाच्या (गुप्त) इमामच्या अनुमतीने प्रस्थापित करण्यात येत आहे असे विधान होते.

ज्यांनी परिपूर्ण सत्य स्वीकारलेले आहे (म्ह. मुसलमान) आणि ज्यांनी त्याचा अव्हेर केला आहे (म्ह. इतर) यांच्यामध्ये समानता असू शकत नाही. ज्या धार्मिक जमातींचे प्रेषितांमार्फत प्रकट झालेले धर्मग्रंथ होते– 'किताबी' उदा., यहुदी किंवा ख्रिस्ती– त्यांना महंमदांनी मर्यादित मान्यता दिली. पण जे बहुदेवतावादी आणि मूर्तिपूजक होते त्यांना मुसलमान होण्याचे आवाहन तरी करण्यात येत असे किंवा त्यांना मृत्यूला कवटाळावे लागे. मुसलमान हीच राज्यकर्ती जमात होती. किताबी जमातीतील एखादी व्यक्ती जर स्वेच्छेने मुसलमान बनली तरच ती राज्यकर्त्या जमातीत सामील होऊ शकत असे. मुस्लिम राज्याच्या प्रदेशांत वसणाऱ्या इतर धार्मिक जमातींशी तहनामे करून त्यांना आंतरिक स्वायत्तता देण्यात येत असे. मुसलमानेतरांवर मुसलमानांच्या तुलनेने अधिक कर लादण्यात येत असत, लष्करात किंवा शासकीय अधिकाराच्या जागांवर त्यांना नेमले जाऊ नये अशी सैद्धान्तिक भूमिका होती. (व्यवहार वेगळा असू शकत असे.)

आपले प्रेषितकार्य हे सबंध मानवजातीसाठी आहे असे महंमद पैगंबर आपल्या जीवनात मानीत असोत, नसोत, मुस्लिम जमातीने त्याचा अर्थ तसा लावला. धर्माचा प्रसार करणे आणि मुस्लिम सत्तेखालील भूमीचा विस्तार करणे हे खलिफाचे प्रमुख कर्तव्य होते. धर्मशास्त्राच्या कायद्याप्रमाणे ज्यांनी मुस्लिम-श्रद्धा स्वीकारलेली नसते त्यांच्याशी शांतता राखणे शक्य नसते. परंतु धोरण म्हणून बराच काळ युद्धबंदी पत्करता येईल. परंतु जोपर्यंत कोणत्याही प्रदेशावर मुस्लिमेतरांचे नियंत्रण आहे तोपर्यंत सत्याच्या राज्याचा जगभर प्रसार करण्याची कामगिरी पुरी होणार नाही. (अपूर्ण)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

¶इस्लामी संस्कृतीची रूपरेखा – २

कौशिक

इस्लामचा उदय एका विशिष्ट ऐतिहासिक चौकटीत झाला. आणि तिच्या विविध घटकांशी इस्लामचा जो संपर्क आला त्यांच्या प्रभावामुळे मूळच्या इस्लाममध्ये अंतर्भूत असलेल्या प्रवृत्तींचा विकास होऊन त्यांना त्यांचे पक्व रूप प्राप्त झाले. एका दृष्टीने पाहता हा संपर्क केवळ योगायोगाने आला होता. इराण, सिरिया आणि इजिप्त ह्या प्रदेशांत उच्च संस्कृती नांदत होत्या. मुसलमानांनी हे प्रदेश जिंकून घेतले आणि ह्यामुळे ह्या संस्कृतींचाही प्रभाव इस्लामवर पडला.

इस्लामने जी संस्कृती निर्माण केली तिचे मूल्यमापन करताना एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. आपल्या शेजारच्या देशांच्या तुलनेने अरबी द्वीपकल्प सांस्कृतिक दृष्टया मागासलेले होते. तेव्हा इस्लामचा प्रारंभीचा विकास ह्या उच्चतर सांस्कृतिक परंपरांशी जुळवून घेण्याच्या प्रक्रियेतून घडून आला. पण अरबी आक्रमकांमध्ये मानसिक आणि राजकीय जोमदारपणा होता. त्यामुळे त्यांनी जिंकलेल्या जमाती जरी संख्येने मोठ्या होत्या आणि अधिक प्रगत होत्या तरी त्या आपल्या जेत्यांना आपल्यात रिचवू शकल्या नाहीत. हळूहळू ह्या जमातींनी इस्लाम धर्म म्हणून स्वीकारला आणि चार शतकांच्या काळात, बायझँन्टाईन प्रदेश सोडला, तर मध्यपूर्वेतील सबंध प्रदेश प्रामुख्याने मुस्लिम बनला. प्रारंभी अशी कल्पना होती की एखाद्या प्रदेशातील जमातीने कोणत्यातरी अरब टोळीशी तिचे मांडलिक म्हणून नाते प्रस्थापित करेपर्यंत त्या जमातीने केलेले धर्मांतर आणि मुस्लिम जमात हे तिचे नवे स्वरूप सामाजिक व राजकीय दृष्टया पक्के होत नसे. पण ह्या समजुतीला इस्लामी धर्मशास्त्रात काही आधार नव्हता. ह्यामुळे ही समजूत हळूहळू गळून पडली आणि अरबेतर जमाती ह्या स्वतःच अरबांइतक्याच पक्वपणे आणि पूर्णपणे मुस्लिम आहेत ही गोष्ट स्वीकारण्यात येऊ लागली.

प्रेषितांच्या सिद्धांतांच्या जडणघडणीवर यहुदी आणि ख्रिस्ती संकल्पनांचा प्रभाव पडलेला आढळतो. कुराणामध्ये प्रेषितांच्या ज्या कथा आलेल्या आहेत त्या बायबलमध्ये प्रबिष्ट असलेल्या कल्पना, प्रतिमा आणि घटना ह्यांनी ओतप्रोत भरलेल्या आहेत. प्रेषितांनी प्रतिपादन केलेला एकेश्वरवाद हा काही प्रमाणात, ईश्वर त्रिविध आहे ह्या ख्रिस्ती सिद्धांताच्या विरोधात त्यांनी विकसित केला होता. पण महंमदांनी जो जीवनमार्ग आखून दिला तो खणखणीतपणे अरबी होता. यात्रेचा त्यांनी नेमून दिलेला विधी आणि ज्या भाषेत त्यांनी इस्लाम प्रकट केला तिच्या लकबी, तिच्यातील युक्तिवाद ह्या गोष्टीही निखालसपणे अरबी होत्या. (अजून तार्किक तत्त्वज्ञानाचा स्पर्श न झालेल्या ह्या भाषेत जो काहीसा ओबडधोबडपणा होता तोही अरबी होता.) इस्लामच्या आधारस्तंभांमध्ये हाजची यात्रा अंतर्भूत झाल्यामुळे आणि अरबी भाषेतील कुराण हा सर्व धर्मशास्त्राचा आदिम प्रस्थानग्रंथ ठरल्यामुळे बराचसा अरबी सांस्कृतिक वारसा इस्लाममध्ये जतन करण्यात आला. मध्ययुगातील आणि आधुनिक काळातील मुस्लिम संस्कृती ही संमिश्र अशी संस्कृती आहे. तथापि तिच्यावरील अरबी झाक टिकून आहे. एक तर अरबी भाषा ही इस्लामी संस्कृतीची प्रातिनिधिक भाषा म्हणून विकसित झाली. शिवाय 'सर्वश्रेष्ठ मानव' जे प्रेषित महंमद त्यांच्या आणि इस्लामच्या आदिकाळातील खलिफांच्या जमातीचे सदस्य म्हणूनही अरबांची खास ईश्वरदत्त प्रतिष्ठा होती. हदीस– म्हणजे प्रेषितांच्या अखंडित परंपरेने चालत आलेल्या स्मृती, ह्या परंपरेचे दुवे असलेल्या साक्षी-

---

¶ या लेखाचा पहिला भाग सप्टें-ऑक्टो. १९८७ या दिवाळी विशेषांकात प्रसिद्ध झाला होता. हा दुसरा भाग. – संपादक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

दारांच्या साखळच्या, ह्यातून विकसित झालेल्या प्रेषितांच्या चरित्रकथा, प्रेषितांचे समकालीन आणि त्यांचे महत्त्वाचे वंशज ह्यांच्या बखरी हे साहित्यप्रकार अरबी भाषेत विकसित झाले आणि इस्लामी संस्कृतीच्या सामायिक वारशात त्यांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. हे साहित्य-प्रकार अरबांनी नव्याने निर्माण केले की ते त्यांनी इतरांपासून घेतले, असा प्रश्न कधीकधी उपस्थित केला जातो. त्याचे उत्तर काहीही असो, अरबांनी ते पूर्णपणे आत्मसात केले ह्याविषयी काही शंका नाही. आपण काही परकी वैचारिक सामग्री आणि परके साहित्य-प्रकार यांचा स्वीकार केला आहे ही जाणीव मुस्लिम पंडित कधीकधी व्यक्त करताना आढळतात. पण मुस्लिम विचारवंतांनी जे काही उसने घेतले असेल त्याची जेव्हा ते अरबी परिभाषेत मांडणी करू शकले आणि त्याचा स्वतःच्या विशिष्ट वैचारिक शैलीत आविष्कार करू शकले तेव्हाच ते प्रभावी ठरले आणि मुस्लिम संस्कृतीत त्याला टिकाऊ स्थान प्राप्त झाले. नाही तर ते वांझोटे ठरते आणि गळून पडते.

ख्रिस्ती देवशास्त्राशी परिचय झाल्यावर मुस्लिमांना आपल्या धार्मिक श्रद्धेचे समालोचन करून, ग्रीक संक-ल्पनांच्या माध्यमातून तिच्या सिद्धांतांची मांडणी करणे भाग पडले. काही शतकांपूर्वी ख्रिस्ती धार्मिक श्रद्धेने ह्याच प्रक्रियेद्वारा स्वतःला बौद्धिक रूप प्राप्त करून दिले होते. इस्लामच्या संदर्भात आता ह्या प्रक्रियेचे पुनरावर्तन झाले. मध्ययुगात ख्रिस्ती युरोप आणि आशियातील इस्लामी प्रदेश यांच्यामध्ये एक खोल वैचारिक आणि भावनिक अनुबंध आढळून येतो. सामान्यपणे पाहता त्याच्या अस्तित्वाची ख्रिश्चनांना आणि मुस्लिमांना जाणीव नव्हती. पण तो होता. त्याचे मूळ ज्या समान प्रक्रियेतून ख्रिस्ती आणि इस्लामी देवशास्त्राचा विकास झाला तिच्यात सापडते. इस्लामी जगात नवव्या आणि दहाव्या शतकांत ग्रीक तत्त्व-ज्ञानाचा– ॲरिस्टॉटल, नव-प्लेटोवाद आणि कमी प्रमा-णात स्टोइक तत्त्वज्ञान यांचा– कसून अभ्यास होत असे. पण तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात म्हणा किंवा त्याच्याहून कमी मूलभूत असलेल्या साहित्याच्या क्षेत्रात म्हणा, शुद्ध ग्रीक विचारांचा स्वीकार करायला हे युग तयार नव्हते. बहुसंख्य मुसलमानांच्या दृष्टीने ॲरिस्टॉटलचे इस्लामी अनुयायी– फलासिफा (फिलॉसॉफर्स)– नेह-मीच 'परके' राहिले. उलट, 'मुताझिलां'वर जरी पाखंडी म्हणून टीका झाली तरी ते 'घरचे' राहिले. साहित्यातही हाच प्रकार दिसून येतो. कदामचे (मृत्यू ९२२) साहित्यशास्त्र ग्रीक संकल्पनांवर आणि वर्गी-करणावर आधारले होते. ते रेखीव आणि सुव्यवस्थित असूनही मान्यता पावू शकले नाही. उलट, अल्-मतझ (मृत्यू ९०८) यांचा साहित्यविचार अपुरा आणि विस्कळीत असूनही प्रभावी ठरला. कारण ग्रीक संक-ल्पनांचे अरबीकरण करण्यात अल्-मतझ यांना अधिक यश लाभले होते.

इस्लामी जमातीच्या धार्मिक गरजांना ह्या परकी कल्पनांनी फारसा स्पर्श केला नाही. देवशास्त्राला अखेरीस ह्या धार्मिक गरजांपुढे नमावे लागते. ९व्या शतकातील एक मोठा वाद 'ईश्वर आणि त्याचा ग्रंथ (कुराण) यांच्यामधील संबंधाचे स्वरूप काय आहे' ह्याविषयी होता. 'ईश्वर आणि 'लोगोस' यांच्या-मधील संबंधाचे स्वरूप काय आहे?' ह्या ख्रिस्ती देवशास्त्रातील प्रश्नासारखा हा प्रश्न आहे. दुसरा संबं-धित प्रश्न म्हणजे ईश्वर आणि त्याचे गुणधर्म यांच्या-मधील संबंधाविषयीचा प्रश्न.) मुताझिलांचे म्हणणे असे होते की कुराण ही ईश्वराची निर्मिती आहे आणि म्हणून त्याचे स्थान दुय्यम आहे. कुराण नित्य आहे असे मानले तर कुराण प्रति-ईश्वर ठरेल. म्हणजे बहुदेवतावाद स्वीकारावा लागेल. इस्लामी सरकारने मुताझिलांची बाजू उचलून धरली. पण सनातनी मत कुराण नित्य आहे, अनिर्मित आहे आणि म्हणून ईश्वराशी समकालीन आहे असे होते. लोकभावनाही सनातनी मताच्या बाजूची होती. म्हणून काही काळानंतर सरकारनेही मुताझिलांना दिलेला पाठिंबा काढून घेतला. कुराणाविषयी जो असीम भक्तिभाव जन-मानसात होता तोच सनातनी मतात प्रतिबिंबित झाला आहे. (हा भक्तिभाव कधीकधी इतका परा-कोटीला जातो की श्रद्धाळू मुसलमानाच्या हातात असलेली कुराणाची प्रत आणि त्याने कुराणाचे केलेले पठण ह्याही अनिर्मित गोष्टी आहेत हा विपरीत सिद्धांत स्वीकारण्यात येतो.) मध्यवर्ती इस्लामवर जरी ग्रीक संकल्पनांचा फारसा पगडा बसला नाही, तरी इस्लामच्या पंथोपपंथांत ॲरिस्टॉटलनंतरच्या ग्रीक तत्त्वज्ञानाचा अधिक यशस्वी प्रकारे शिरकाव झाला. विशेषतः दहाव्या शतकाच्या अखेरीस 'ग्नॉस्टिक' संकल्पनांचे इस्लामीकरण करण्याचे बरेच प्रयत्न झाले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

ह्या पंथांच्या सिद्धांतांची संकल्पनात्मक चौकट आणि त्यांची युक्तिवादाची पद्धती जरी सामान्यपणे ग्रीक (हेलेनिस्टिक) होती तरी त्यांचा आशय कुराण आणि इस्लामी परंपरा यांच्यापासूनच प्राप्त झालेला होता. इस्लामी गूढवादाच्या परिभाषेतही हेलेनिस्टिक संकल्पनांनी प्रवेश केला. पण इस्लामी भक्तिपंथाची जी पारंपरिक भाषा होती तिच्यात ह्या संकल्पना इतक्या चपखलपणे बसल्या की मुसलमान साधकांना त्यांच्या परकेपणाची जाणीव झाली नाही.

विज्ञानाच्या क्षेत्रामध्ये मात्र स्वकीय विज्ञाने आणि परकीय विज्ञाने हा भेद कधी लुप्त होऊ शकला नाही. ग्रीक वैज्ञानिक वारसा जरी मुस्लिम विचारवंतांनी आत्मसात केला आणि त्याच्यात भरही घातली तरीही ही गोष्ट होऊ शकली नाही. स्वकीय किंवा अरबी शास्त्रे ही मूलतः धर्म आणि भाषा यांच्याविषयीची शास्त्रे होती. धर्माविषयीच्या शास्त्रांचा विकास कुराणावरील भाष्ये, कुराणातील वचनांची चिकित्सा, हदीस, न्यायशास्त्र आणि सैद्धान्तिक देवशास्त्र ह्या शास्त्रांत झाला. भाषिक शास्त्रातून व्याकरण, शब्दकोश, अलंकारशास्त्र, साहित्यशास्त्र यांचा उद्‌भव झाला. परकीय शास्त्रांना प्राचीनांची शास्त्रे असेही म्हणत. इब्न तुमलुस (मृत्यू १२२३) यांनी स्वकीय आणि परकीय शास्त्रे ह्यांच्यामधील भेदाचे केलेले स्पष्टीकरण असे आहे की स्वकीय शास्त्रे ही इस्लामने स्वतः विकसित केलेली विशिष्ट शास्त्रे आहेत तर परकीय शास्त्रे ही सर्व लोकांना आणि धार्मिक जमातींना समान आहेत. परकीय शास्त्रे ही प्रामुख्याने ग्रीकांनी विकसित केलेली शास्त्रे होत. त्यांच्यात तर्कशास्त्र, गणिताच्या वेगवेगळ्या शाखा, तत्त्वमीमांसा (मेटॅफिझिक्स), प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र, वैद्यक, ज्योतिष, संगीत, जादूविद्या आणि किमया (आल्केमी) या शास्त्रांचा समावेश होता.

अरब विचारवंतांनी ह्या शास्त्रांचा कसोशीने अभ्यास केला आणि त्यांच्यात भर घालण्याचे यशही संपादन केले. तरीही धार्मिक मुसलमानांची ह्या परकीय शास्त्रांविषयीची दृष्टी काही प्रमाणात संशयग्रस्त अशीच होती. किंबहुना मध्ययुगाच्या अखेरच्या पर्वात त्यांच्याविषयीची वितुष्टाची भावना बळावत गेली. हा विरोध ह्या शास्त्रांचे जे विषय होते त्यांच्यामुळे जसा होता तसाच ह्या शास्त्रांचे प्रवर्तक, आणि ज्यांची मते निर्णायक मानली जात असे अधिकारी पूर्वसूरी परकी, मुस्लिमेतर होते ह्या कारणामुळेही होता. ज्याच्यामुळे आपली श्रद्धा धोक्यात येईल अशा शास्त्राचा अभ्यास करण्याचे धार्मिक माणसांनी टाळले पाहिजे, त्यांच्या दृष्टीने शास्त्रांचे मूलभूत वर्गीकरण स्वकीय आणि परकीय शास्त्रे हे नव्हे; ते (धार्मिक दृष्टचा) प्रशंसनीय आणि निंद्य शास्त्रे असे असले पाहिजे. इहलोकात किंवा परलोकात जी शास्त्रे निरुपयोगी असतील ती निंद्य असतात. निरुपयोगी ज्ञानापासून आपले संरक्षण करावे अशी प्रेषिताने ईश्वराची प्रार्थना केल्याचे सांगण्यात येते. ‘ उपयुक्त ’ ज्ञान ह्याचा सनातनी देवशास्त्रज्ञांनी जो अर्थ लावला तो धर्माच्या आचरणासाठी आवश्यक किंवा उपकारक असलेले ज्ञान असा होता. अशा रीतीने इस्लामी संस्कृतीत दोन भिन्न आणि बऱ्याच प्रमाणात परस्परांपासून स्वतंत्र असलेल्या अशा बौद्धिक परंपरा आढळतात. एक तत्त्वज्ञानात्मक-वैज्ञानिक होती, दुसरी धर्मशास्त्र-देवशास्त्रावर आधारलेली होती. ह्या दोहोत कलह होता आणि त्याची परिणती प्राचीन शास्त्रे हळूहळू हटण्यात झाली.

यादवी युद्धांमुळे इस्लामी साम्राज्याचे केंद्र प्रथम अरबस्तानातून सिरियामध्ये आणि नंतर इराकमध्ये सरकले. खलिफा हा मुस्लिम राज्याचा पालक आहे ही मूळची कल्पना होती. तिच्या जागी अब्बासिद राज्यकर्त्यांनी पद्धतशीर आणि सुव्यवस्थित शासनयंत्रणा निर्माण केली. सिरियन कालखंडाच्या अखेरीस ह्या प्रक्रियेला प्रारंभ झाला होता. ही शासनव्यवस्था ससानियन धर्तीवर संघटित करण्यात आली होती. सरकारी खाती वाढत गेली, प्रत्येक खात्याचे कार्यक्षेत्र आणि अधिकारक्षेत्र स्पष्टपणे आखून देण्यात आले आणि त्याची कार्यपद्धतीही काळजीपूर्वक नियमित करण्यात आली. दहाव्या शतकात खलिफाची शासनव्यवस्था अशा दहा खात्यांमार्फत चालत असे; खात्याला ‘ दिवाण ’ म्हणत. युद्धखाते, राज्याचा कोषागार, टपालखाते, दरबाराच्या खर्चाची व्यवस्था करणारे खाते, ही खात्यांची काही उदाहरणे होत. दिवाणांच्या प्रमुखांचे एक मंडळ असे आणि वझीर त्याचा अध्यक्ष असे. राज्याच्या प्रत्येक प्रदेशाचा कारभार एक लष्करी प्रमुख आणि नागरी प्रशासनाचा प्रमुख हे संयुक्तपणे चालवीत. कधीकधी ही दोन्ही कार्ये व अधिकार एकाच व्यक्तीकडे सोपविण्यात येत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

जेव्हा असे होई तेव्हा तो प्रदेश राज्यापासून अलग होऊन स्वतंत्र राज्य म्हणून नांदण्याच्या दिशेने पडलेले ते पहिले पाऊल ठरे. राज्याचे वार्षिक अंदाजपत्रक काळजीपूर्वक बनविण्यात येत असे. दहाव्या शतकात दरबारावरील खर्च वाढू लागला आणि त्यासाठी सीमेवरील किल्लेकोटांची किंवा तटबंदीची निगा राखणे, किंवा रस्तेबांधणी ह्या सार्वजनिक सेवांवरील खर्च कमी करण्यात आला. मुस्लिम साम्राज्याच्या अवनतीच्या कालखंडाला ह्या प्रक्रियेपासून सुरुवात झाली आणि ह्या अवनतीची काही कारणेही तिच्यात प्रतिबिंबित झाली होती असे म्हणता येईल. दरबारात साहित्यिकांचा व व्युत्पन्न पंडितांचा भरणा असे. प्रबोधनकाळी (रेनेसां) युरोपीय राजांच्या दरबारात ग्रीक भाषेत व विद्यांत प्रवीण असलेल्या पंडितांच्या स्थानासारखेच त्यांचे स्थान होते.

इस्लामी प्रदेशातील जनतेची पहिली निष्ठा इस्लामशी असे. ही निष्ठा जिंकून घेण्यात इस्लाम यशस्वी ठरला होता ह्यात शंका नाही. पण ह्यामुळे एक राजकीय व सामाजिक शक्ती म्हणून राष्ट्रवाद निष्प्रभ झाला नाही. अरबेतर मुसलमानांचे स्थान इस्लामी समाजाच्या संदर्भात दुय्यम, कनिष्ठ होते. पण आपल्या सांस्कृतिक कामगिरीचे आणि आपल्या पूर्वजांच्या थोर कृत्यांचे गोडवे गाऊन त्यांनी ह्याची भरपाई करण्याचा प्रयत्न केला. अरबांच्या चालीरीती आणि आचरण असंस्कृत, रासवट आहेत असा दोष ते त्यांच्या पदरी घालीत. अरबांना सर्वांत प्रखर अभिमान त्यांच्या उच्च वंशपरंपरेविषयी वाटे. तेव्हा हे अरबेतर टीकाकार अरबी टोळ्यांमध्ये मागे कधीतरी घडलेल्या भानगडींविषयीच्या कंड्या उकरून काढून ह्या वंशपरंपरेच्या शुद्धतेविषयी संशय व्यक्त करीत. अरब अर्थात ह्या आघातांचा प्रतिकार करीत. जेव्हा अब्बासीद राज्यकर्त्यांच्या दरबारात इराणी प्रभाव अधिक वरचढ ठरू लागला तेव्हा खुद्द ईश्वराच्या प्रेषिताच्या जमातीचे आपण घटक आहोत, आपल्या (अरबी) भाषेच्या संपन्नतेला जगात तोड नाही, अरबी काव्याचे सौंदर्य केवळ अतुलनीय आहे ह्या मुद्द्यांवर अरब आपल्या सर्वश्रेष्ठत्वाचा दावा आधारू लागले. ह्या बऱ्याचशा टीका-प्रतिटीकेची पातळी अर्थात बालिश होती. पण त्यांतून लोकांच्या मनात जे ढवळत होते त्याचा प्रत्यय येतो.

इस्लामी अधिसत्तेचा भंग होण्याला आठव्या शतकात प्रारंभ झाला पण नवव्या आणि दहाव्या शतकांत ह्या प्रक्रियेला वेग चढला. साम्राज्यात ज्या भिन्नराष्ट्रीय जमाती सामावलेल्या होत्या त्यांना अनुसरून साम्राज्याचे विभाग झाले. पश्चिमेला स्पेन, बर्बर उत्तर आफ्रिका आणि इजिप्त, आणि पूर्वेला इराणी प्रदेश ह्यांनी आपले स्वातंत्र्य परत मिळविले. अरबीभाषिक प्रदेशांतही सिरिया, इराक आणि अरबी द्वीपकल्प ह्या भागांत प्रादेशिक हितसंबंधांनी आपले प्रभुत्व प्रस्थापित केले. ह्या राजकीय फाळणीमुळे कायरो आणि कॉर्डोव्हा ह्या शहरांची अरबी-इस्लामी संस्कृतीची केंद्रे म्हणून गणना होऊ लागली. ह्या राजकीय विभाजनाचे निराकरण करून मूळची एकसंधता प्रस्थापित करणे इस्लामला शक्य झाले नाही. पण इस्लामी संस्कृतीच्या एकसंधतेला त्यामुळे कधी तडा गेला नाही. इस्लामी विद्वान सबंध इस्लामी प्रदेशात मोकळेपणे प्रवास करीत असत; मग राज्यकर्ते कुणीही असोत. मुत्सद्दी लोक एका राजाची चाकरी सोडून दुसऱ्याच्या चाकरीत सहजपणे प्रवेश करीत. राजकीय विभागणीवर समान श्रद्धा आणि समान शिक्षणक्रम अशा रीतीने मात करीत. इस्लामी जनतेची जशी भिन्न राज्यांत विभागणी झाली होती तशीच भिन्न धार्मिक पंथांतही झाली होती. इस्लामी जनतेत वेगवेगळे सामाजिक थरही अर्थात होते. एका राज्यात अनेक राष्ट्रीय समूह किंवा पंथ वसत असत, एक राष्ट्रीय समूह किंवा एक पंथ अनेक राज्यांत विभागलेला असे, एका पंथात अनेक सामाजिक थर सामावलेले असत किंवा एक थर अनेक पंथांत विभागलेला असे अशी गुंतागुंत होती. भिन्न इस्लामी पंथ आंतरराष्ट्रीय होते पण सामान्यपणे त्यांना कोणत्या तरी राज्यात राजकीय सत्तेचे अधिष्ठान असे आणि त्यांचे अनुयायी विशिष्ट सामाजिक थरांतून आलेले असत. उदा., कडवे शिया हे कारागीर वर्गातील असत. सुन्नी इस्लाम कुणाला पाखंडी म्हणून जाहीरपणे स्वतःतून बहिष्कृत करायला उत्सुक नसे. ह्या संदर्भात प्रेषितांचे म्हणून एक वचन उद्धृत करण्यात येत असे. ते असे की, इस्लामच्या अनुयायांत जे मतभेद होतील ती ईश्वराची कृपाच असेल. इस्लाममध्ये एकंदर ७३ पंथ उदयाला येतील आणि त्यांतील एक सोडून इतर सर्व बरोबरच असतील असेही प्रेषितांनी म्हटल्याचे सांगण्यात येत असे. धर्मशास्त्रज्ञही जरी कुणाला बहिष्कृत करावे हे नेमकेपणे मांडायला अळंटळं करीत असत तरी पाखंडीपणा खपवून

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

घेण्याच्या बाबतीत त्यांची वृत्ती जनसामान्यांपेक्षा अधिक कडक होती. धार्मिक पंथ अर्थात काटेकोर असत. आपले अनुयायीच काय ते खरे सश्रद्ध मुसलमान होत असे ते मानीत. गझाली यांनी फलासिफांना (तत्त्ववेत्त्यांना) मुसलमान जमातीतून बहिष्कृत केले होते. पण मुताझिल आणि इतर अनेक पंथ ह्यांना बहिष्कृत करणे योग्य ठरेल की नाही ह्याविषयी त्यांचे मत डळमळीत होते. कारण त्यांची अनेक मते चूक असली तरी सत्य सिद्धांतांच्या विरुद्ध नव्हती, त्यांच्यापासून काहीशी दूर होती असे त्यांना आढळून आले. शिवाय इतर बाबतींत सत्य सिद्धांतांचा स्वीकार करून त्यांनी आपल्या चुकांची भरपाई केली आहे असेही त्यांचे मत झाले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे कुराणात जो नियम आढळतो तो एवढाच की इस्लामच्या प्रेषिताला जो नाकारील त्याला बहिष्कृत करावे. ह्या संदर्भात एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे. जिचा निर्णय सर्व मुसलमानांवर बंधनकारक आहे अशी संस्था किंवा एखादे मंडळ इस्लाममध्ये नाही. पण विशिष्ट प्रसंगी धर्मशास्त्रज्ञांचे एखादे मंडळ एखाद्या माणसाला तो पाखंडी आहे ह्या कारणासाठी देहांताची शिक्षा द्यायचा अधिकार राज्यकर्त्यांना देत असे. राज्य उलथून टाकण्याचा प्रयत्न करणारे पाखंडी पंथ अर्थात शिक्षेला पात्र असत. पण ते सोडले तर अद्वैताचा पुरस्कार करणाऱ्या इस्लाममधील पंथांना पाखंडी म्हणून शिक्षा होण्याचा सर्वांत जास्त धोका असे.

कोणत्याही कालखंडातील साहित्य घेतले, तर त्याच्यात अनुभवाचा जो आविष्कार झालेला असतो त्याला दुहेरी मर्यादा असते. अनुभवाच्या काही अंगांना महत्त्व देणारे आणि इतर अंगांकडे दुर्लक्ष करणारे असे काही संकेत समाजात प्रचलित असतात. शिवाय परंपरेने जे साहित्यप्रकार, प्रतिमा, शैली व्यक्तींना उपलब्ध असतात त्यांचीही मर्यादा त्यांच्या वैयक्तिक अभिव्यक्तीला पडत असते.

ग्रीक आणि लॅटिन साहित्यांप्रमाणेच अरबी साहित्यही विशिष्ट साहित्यप्रकारांची भिन्न स्वरूपे आणि प्रत्येक साहित्यप्रकाराला आधारभूत असलेले अंतर्गत नियम आणि संकेत ह्यांच्याविषयी अतिशय जागरूक आहे. पण ग्रीक आणि लॅटिन साहित्याच्या तुलनेने अरबी साहित्यात वाङ्मयप्रकारांची विविधता कमी आहे. नाटक आणि महाकाव्य (एपिक) हे प्रकार अरबी साहित्यात विकसित झालेच नाहीत. गद्यापेक्षा काव्य श्रेष्ठ मानले जाते. (ह्याविषयी मतभेद व्यक्त करणारे तुरळक साहित्यशास्त्रज्ञ असले तरी सर्वसाधारणपणे हे मत मान्य होते.) गद्य लिहिण्यापेक्षा काव्य लिहायला अधिक कौशल्य लागते ह्या समजुतीवर हे मत आधारले होते. विशिष्ट वाङ्मयप्रकाराच्या उत्कृष्टतेचे जे पारंपरिक दंडक आणि नियम होते त्यांचे पालन झालेच पाहिजे असा रसिकांचा आग्रह असे. सर्वसाधारण समीक्षकाचा तर असा विशेष आग्रह असे. (व्याकरण आणि शब्दकोश यांचे अध्ययन केल्यानंतर विद्यार्थी साहित्यशास्त्राकडे वळे.) उदा., 'कशिदा' हा एक काव्यप्रकार आहे. त्याची रचना ठरीव पद्धतीने करावी लागे. प्रारंभी कवी भूतकालातील एखाद्या प्रेमप्रकरणाचे स्मरण करी; ते जेथे घडले आणि जेथून कवी परागंदा झाला त्या स्थळाचे वर्णनही आले तर उत्तमच; नंतर स्वतःचे सांत्वन करण्यासाठी कवी एका उत्कृष्ट उंटावर स्वार होऊन वाळवंटातून संकटांनी ग्रासलेल्या प्रवासाला निघे; आणि शेवटी तो एखाद्या राजाला किंवा सरदाराला उद्देशून काही विनंती करी, किंवा स्वतःच्या टोळीची किंवा स्वतःची स्तुती करी किंवा कोणत्यातरी राजकीय समस्येवर आपल्या गटाचा प्रवक्ता म्हणून काही भाष्य करी. सबंध मध्ययुगातील काव्यात प्रेषितापूर्वीच्या अभिजात अरबी काव्याची परंपरा मुख्यत्वेकरून जोपासली गेली. ही प्रथा बाराव्या शतकापर्यंत चालली. पण फारसी आणि ग्रीक साहित्यांचा अरबी साहित्यावर प्रभाव पडल्याशिवाय राहिला नाही.

नगरे आणि नागरी वसाहती ही इस्लामपूर्व अरबी संस्कृतीची खरी केंद्रे होती. पण तत्कालीन अरबी साहित्य वाळवंटातील भटक्या बदाऊन टोळ्यांच्या मूल्यांना आणि आदर्शांना वाहिलेले होते. ह्या वाङ्मयीन परंपरेचे प्रामाण्य प्रस्थापित झालेले असल्यामुळे इस्लामी काव्यातही मरु-भावकविता (डेझर्ट लिरिक्स) हा काहीसा विसंवादी साहित्यप्रकार टिकून राहिला. आबासीद राजवटीच्या प्रारंभीच्या कालखंडात इस्लामी काव्याला लक्षणीय बहर आला. राजदरबारातला रंगीबेरंगी उल्हास, स्वच्छंदी, दुराचाऱ्याची पश्चात्तापाची भावना आणि तिच्या अनुषंगाने येणारे नैतिक चिंतन, आणि प्रेयसीविषयी आराधनेचा भाव बाळगणारी अत्यंत तरल अशी प्रेमभावना यांचा समर्थपणे आविष्कार करणारे साहित्यकार निर्माण

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

करण्यात आले. प्रेमाची ही संकल्पना स्पेनमधून फ्रेंच शाहीरांच्या (ट्रूबॅडूर) काव्यात प्रविष्ट झाली आणि तिच्याबरोबर स्पॅनिश अरबांच्या आवडीचे काही गुंतागुंतीचे छंदही त्यांनी उचलले. परंपरावादी कवींनी चालत आलेल्या चौकटीचा स्वतःच्या भाषिक पटुत्वाचे डौलदार प्रदर्शन करण्यासाठी वापर केला तर आधुनिकतावादी कवींनी नवीन हलकेफुलके चपळ छंद निर्माण केले. राजदरबाराचा आणि साम्राज्यातील सरदारदरकदारांचा आश्रय कवींना मिळाल्यामुळे ते सत्ताधीशांचे प्रवक्ते बनले. अनेकदा त्यांची आर्थिक स्थिती सुधारली आणि सामाजिक दर्जा उंचावला. ह्यामुळे कवींचा लाभ झाला तरी काव्याची हानी झाली. सत्ताधाऱ्यांची स्तुती करण्यात (किंवा त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांची निंदा करण्यात) काही ताळमेळ राहिला नाही. ठरीव भावनांचा आणि आकांक्षांचा आविष्कार काव्यात होत राहिल्यामुळे त्यांचीच अभिव्यक्ती करण्यात अगोदरच्या कवींवर कडी करण्याची आवश्यकता प्रत्येक कवीला भासे. शिवाय प्रस्थापित वाङ्मयीन अभिरुचीला अनुसरून कवीला काही मर्यादित विषयच उपलब्ध असत. परिचित विषय, भावना, अलंकार यांची यशस्वीपणे पुनर्मांडणी करण्यात कवीची मौलिक प्रतिभा दिसून येते असा समज होता. ह्यामुळे मध्ययुगाच्या उत्तरार्धात सर्जनशीलता हळूहळू क्षीण होत गेली आणि काव्यातील शब्दचमत्कृती आणि अर्थचमत्कृती यांत पूर्वी जो चमकदारपणा होता तो मंदावत गेला. फक्त गूढवादी काव्यात कवीचे सर्जनस्वातंत्र्य सुरक्षित राहिले. कारण जो अनुभव कवीला व्यक्त करायचा असे त्याच्या उत्कटतेमुळे त्याच्यावर प्रस्थापित संकेतांचे दडपण पडणे कठीण असे. गूढवादी काव्याला साहित्यिक परंपरावादापासून धोका नव्हता. त्याला धोका होता तो दुर्गम्यतेचा होता.

अरबी अभिरुची एका विशिष्ट वळणाची होती. सबंध काव्याची रचना उत्कृष्ट असावी ह्यापेक्षा एकेक ओळ किंवा कडवे किंवा श्लोक शक्य तितका सुरेख, चमकदार असावा ह्यावर तिचा भर असे. गद्यामध्येसुद्धा विस्ताराने केलेल्या कथनापेक्षा एखादा चुटका, आख्यायिका ह्यांचे त्यांना आकर्षण असे. लोकप्रिय ठरलेल्या गद्यात ह्याहून अधिक विस्तृत कथन आढळते. पण त्यातील कथासुद्धा फुटकळ प्रसंगांची सैल मालिका ह्या स्वरूपाच्याच असतात.

सबंध साहित्यकृतीची योजना करून तिची काळजीपूर्वक रचना करणे हे इराणी साहित्यिकांचे वैशिष्टच होते. इराणची इतिहासलेखनाची परंपरा होती. तिचा विकास करून ह्या साहित्यिकांनी महाकाव्याची एक थोर परंपरा घडविली. इराणचा इतिहास, त्यानंतर काल्पनिक कथा, नंतर गूढवादी अनुभव हे कालानुक्रमे ह्या काव्यांचे लोकमान्य विषय होते. कर्बाला येथे हुसेनच्या झालेल्या मृत्यूच्या प्रसंगावर केंद्रित झालेले धार्मिक नाट्यवाङ्मयही इराणमध्ये निर्माण झालेले होते. सर्जनशील कल्पनाशक्ती आणि अलंकारिक, प्रतिकात्म भाषेच्या धुंदीत रममाण होण्याची प्रवृत्ती ह्यांत इराणी लोक अरबांवर ताण करीत असे दिसते. परंतु मूलतः इराणी अभिरुची ही अरबी अभिरुचीच होती. मध्ययुगीन युरोपिअन अभिरुचीशी एकंदरीत जुळणारी अशी ही अभिरुची होती. पारंपरिक साहित्यशास्त्राचे प्रामाण्य ती शरणपूर्वक स्वीकारीत असे. विशिष्ट प्रसंग आणि अनुभव यांतून प्राप्त होणारे बौद्धिक सिद्धांत स्पष्टपणे मांडण्याची तिला हौस असे. साहित्याची शैली आणि आशय विद्वत्ताप्रचुर असत. तंत्रावर भर असे. भरजरी पोत, तपशीलवार वर्णने तिला रुचत असत. आणि सर्वांत म्हणजे जे विचित्र, लोकविलक्षण आणि म्हणून जिज्ञासेला चाळवणारे असे त्याचे तिला आकर्षण असे. मुस्लिम कवीची आकांक्षा रसिकाला चकित करण्याची असे. मध्ययुगातील युरोपिअन कवीप्रमाणे वाचकात नवलाची, आश्चर्याची भावना जागृत करण्याचा त्याचा प्रयत्न असे. प्रतिमा आणि सुभाषिते ह्यांच्या साहाय्याने काव्यात हा परिणाम साधला जाई. गद्यात मधूनमधून विषयाला सोडून स्वतंत्रपणे केलेले विवेचन, नवलकारक गोष्टींची वर्णने आणि एका विषयापासून दुसऱ्या विषयाकडे अचानकपणे घेतलेले वळण यांचा त्यासाठी वापर करण्यात येई. वाचकाचे लक्ष मंदावू नये ह्यासाठी सर्व उपाय वापरण्यात येत. एकाच विषयावर बराच काळ लक्ष केंद्रित करण्याची वाचकाचीही इच्छा नसावी असे दिसते. ह्यामुळे श्रेष्ठ गद्यलेखकांच्या साहित्यामध्येही एका प्रसंगाकडून चटकन दुसऱ्या प्रसंगाकडे वळण्याची प्रवृत्ती आणि सुसंगत, एकात्म रचनेचा अभाव ह्या गोष्टी आढळून येतात. ह्या मार्गाचा अवलंब केल्याशिवाय तरणोपाय नाही अशी त्यांची धारणा असणार.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

९ व्या आणि दहाव्या शतकांतील लेखकांनी ऐतिहासिक व्यक्ती आणि प्रसंग यांचे प्रत्ययकारी वर्णन करण्यात विशेष यश मिळविले. ह्या लिखाणामुळे माणसांविषयीचे मानसशास्त्रीय कुतूहल अधिक सखोल झाले यात शंका नाही. पण हे मानसशास्त्रीय चित्रण सरळ, साधे असे. त्यात विशेष चिंतनशीलता नव्हती. सभ्यतेची जी मुस्लिम कल्पना होती– जी अजूनही टिकून आहे– तिच्यात इतरांविषयी बोलताना एक मर्यादा पाळली पाहिजे हा आग्रह असे. गुह्य गोष्टी गुह्य राखल्या पाहिजेत अशी भावना होती. ह्यामुळे साहित्यात माणसाच्या मनाचे आणि वर्तनाचे सर्वांगीण आणि सखोल विश्लेषण करण्याला प्रतिबंध होई. ग्रीक साहित्यात आणि आधुनिक युरोपीय साहित्यात माणसांची ज्या प्रकारची, मानसशास्त्राच्या दृष्टीने समाधानकारक ठरतील अशी चरित्रे आढळून येतात तशी मुस्लिम साहित्यात आढळून येत नाहीत. असे असले तरी इस्लामी साहित्यात चरित्रांचा जो संग्रह आढळतो तो आश्चर्यकारक ठरावा इतका समृद्ध आहे. राजकीय आणि सांस्कृतिक इतिहासाची सामग्री अशा रीतीने जतन करण्यात आली आहे. ह्या संग्रहाशी ज्याची दुरूनही तुलना करता येईल असे मध्ययुगीन युरोपात काहीच आढळत नाही. मुस्लिम लेखक भावनांचे निरीक्षण जागरूकपणे आणि उत्कट कुतूहलाने करीत असे. पण ते धार्मिक साहित्यात, पापी माणसाला झालेल्या उपरतीच्या वर्णनात किंवा कदाचित एखाद्या ऐतिहासिक घटनेच्या कथनात प्रतिबिंबित होई. ह्या निरीक्षणाचा लाभ फक्त भक्तिपर साहित्याला झाला आहे.

चौदाव्या आणि पंधराव्या शतकांत मुस्लिम साहित्य, इतिहास इत्यादींच्या अध्ययन-अध्यापनाचे पुनरुज्जीवन झाले. पांडित्य सर्जनशील असले पाहिजे, पारंपरिक वारशात नवी भर घालण्याची क्षमता त्याच्यात असली पाहिजे हा आग्रह ह्या पुनरुज्जीवनात आढळून येतो. तथापि साहित्याची अवनती होण्याच्या कालखंडात जे वाङ्मय निर्माण झाले होते त्यातील बहुसंख्य कृतींच्या अनुरोधाने ह्या साहित्यशास्त्राने आपले कार्यक्षेत्र आणि पद्धती निश्चित केली होती. ह्या संदर्भात अल्मावी (मृत्यू १५७३) यांनी पूर्वीच्या एका साहित्यशास्त्रज्ञाचे उद्धृत केलेले मत असे आहे :

"साहित्यसेवेचे सात प्रकार आहेत : (१) नवी रचना करणे; (२) विशिष्ट साहित्यकृतीत जे दोष असतील ते सुधारणे; (३) विशिष्ट साहित्यकृतीत ज्या चुका झाल्या असतील त्या दाखवून देणे; (४) विशिष्ट साहित्यकृतीत अतिरेकी संक्षेपामुळे जे भाग समजायला कठीण असतील त्यांतील अडचणींचे स्पष्टीकरण करणे; (५) जे भाग दीर्घ आणि कंटाळवाणे असतील त्यांचा त्या सबंध साहित्यकृतीच्या आकलनात विक्षेप येणार नाही अशा रीतीने संक्षेप करणे; (६) साहित्यकृतीच्या ज्या भागांची वाईट रचना झालेली असेल त्यांची, तिच्या मूळ रचनेला कमीत कमी धक्का बसेल अशा रीतीने, योग्य प्रकारे पुनर्रचना करणे; (७) पूर्वसूरीच्या एखाद्या विशिष्ट कृतीत तिच्यातील सामग्रीची जेथे वाईट प्रकारे रचना झाली असेल अशा स्थळांची कल्पकतेने पुनर्रचना करून त्या साहित्यकृतीपासून लोकांना सुलभतेने धडे घेता येतील असे रूप तिला देणे.

इस्लाम-पूर्व अरबस्तानात काव्याशिवाय इतर कोणत्याही कलेचा विकास झालेला नव्हता. जिच्यावर नवीन बांधणी करता येईल अशी ललितकलांची मूळची परंपरा इस्लामला उपलब्ध नव्हती. तेव्हा "इस्लामी देशांत ज्या कला आहेत त्या, अरबांनी त्यांना जिंकण्यापूर्वी त्यांच्यात ज्या ग्रीक-रोमन परंपरा नांदत होत्या त्यांच्यापासून प्राप्त झालेल्या आहेत. कधीकधी हा प्रभाव सरळ, साक्षात झालेला दिसून येतो; इतर वेळी ससानियन (इराणी) आणि कॉप्टिक कलापरंपरांच्या द्वारा तो झालेला असतो; ह्याशिवाय भारतासारख्या देशाकडून आलेल्या बाह्य प्रभावाचे अस्तित्वही जाणवते."

इस्लामच्या धार्मिक विधीमध्ये जे उग्र गांभीर्य आणि साधेपण आहे ते इस्लामने कधी गमावले नाही. तेव्हा मशिदीच्या कोषागारांसाठी सोन्याचांदीच्या वस्तूंवर कलाकुसरीची कामे करण्यासाठी कारागिरांना उत्तेजन लाभत नसे. वास्तुकलेला एऱ्हवी जो बहर आला असता त्याच्यावरही ह्यामुळे मर्यादा पडली. प्रारंभी मशीद ही साधेपणे रचलेली अनलंकृत अशी इमारत असे. अरब देशांत मशिदीपेक्षा तिचे प्रांगण हे अधिक मोठे असे, प्रार्थनेपूर्वी शरीराचे अवयव धुण्याचा जो विधी आहे त्याच्यासाठी कारंज्याची सोय ह्या उघड्या प्रांगणात असे. प्रार्थनेची बांग ज्याच्यावरून देण्यात येते तो मनोरा हे मशिदीच्या इमारतींच्या समूहाचे लक्षवेधक वैशिष्ट्य असे. आतल्या भिंतींना एक तर फक्त

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

सफेद रंग फासलेला असे; नाही तर कुराणातील वचने आणि प्रेषित व धार्मिक वर्तनाचे आदर्श घालून देणारे प्रारंभीचे खलिफा यांची नावे त्यांच्यावर लिहिलेली असत. ज्या अक्षरावलीत ही वचने व नावे लिहिलेली असत ती बुट्टीदार असे व त्यामुळे भिंतींना शोभा येई. अनेकदा ही अक्षरावली संगमरवरी किंवा इतर प्रकारच्या फरशांच्या गुळगुळीत पृष्ठभागावर लिहिलेली असे. रिकाम्या दालनांना संकुचित न करता त्यांतील कठोर शांततेला सौम्य करण्याचे कार्य ह्या फरशांचे मृदू रंग आणि त्यांवरील वेलबुट्टी करीत असे. आशियाच्या ह्या भागात जिवंत प्राण्यांची चित्रे काढण्याला किंवा त्यांच्या प्रतिकृती करण्याला प्रतिकूल अशी वृत्ती प्राचीन काळापासून होती. ह्या प्रदेशात वेगवेगळचा काळांत नांदलेल्या भिन्न संस्कृतींत ही वृत्ती आढळून येते. इस्लाममध्ये ही वृत्ती स्पष्टपणे प्रकट झाली आहे. प्रेषितांचे एक वचन वारंवार निर्दिष्ट करण्यात येते. निर्णयाच्या दिवशी चित्रकाराला किंवा मूर्तिकाराला आपल्या कलाकृतीत प्राण फुंकून त्यांना तू जिवंत कर अशी आज्ञा करण्यात येईल आणि तसे करायला तो असमर्थ ठरला तर आगीत जळण्याची शिक्षा त्याला देण्यात येईल अशा अर्थाचे हे वचन आहे. प्रारंभीच्या आणि अधिकृत इस्लाममध्ये संत असे कुणी नाहीत. ह्यामुळे चित्रकाराला ऐहिक वस्तू आणि प्रसंग ह्यांच्यावर लक्ष केंद्रित करणे भाग पडले असते. जिवंत वस्तू 'निर्माण' करण्याच्या औद्धत्याच्या किंवा अधिकारातिक्रमणाच्या आरोपापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी मुस्लिम कलाकार प्राण्यांसारखी हुबेहूब चित्रे न काढता विसदृश चित्रे काढीत असे. ग्रंथ सुशोभित करण्यासाठी चित्रे काढताना विशेषतः इराणी चित्रकार इस्लामी इतिहासातील आणि प्रेषिताच्या जीवनातील प्रसंगांची चित्रे काढायला अनमान करीत नसे. कधीकधी प्रेषितांचे चित्र काढण्याचेही धाडस तो करीत असे. परंतु, लघुचित्रकलेचा (मिनिएचर) जरी सुरेख विकास झाला तरी धार्मिक आदेशावर आधारलेल्या पूर्वग्रहामुळे चित्रकला कुंठित झाली आणि मूर्तिकला पूर्णपणे वर्ज्य झाली. वास्तुकला, तसेच अक्षररेखनकलेसारखी (कॅलिग्राफि) 'गौण' कला हीच मुस्लिम कलावंतासाठी आत्माविष्काराची क्षेत्रे म्हणून मोकळी राहिली. वस्तूची प्रतिकृती, प्रतिमा, प्रतिबिंब निर्माण करण्याऐवजी वस्तूंना सुशोभित करणे हे कलेचे उद्दिष्ट ठरले. रिकाम्या जागेच्या भीतीतून भिंतीवर, हस्तलिखितांत, फुलदाणीच्या पृष्ठभागावर उपलब्ध असलेली जागा बहरलेल्या वेलबुट्टीच्या साहाय्याने अलंकृत करण्यात येऊ लागली. ह्या वेलबुट्टीत हरतऱ्हेचे आकार शिताफीने आणि प्रयासाने एकमेकात गुंतविलेले असत, प्रारंभ आणि शेवट एकजीव झालेले असत, आणि कुराणातील वचने व वक्र रेषा ह्यांचा एकमेकांशी बेमालूमपणे सांधा जुळविलेला असे. ह्या अलंकाराला कोणताही बौद्धिक अर्थ नसे. अलंकृत मशिदीचे उग्रगंभीर स्वरूप कायम राहिले पण तिचे साधेपण हरवले. तिच्या वास्तूच्या रचनेची स्पष्टता संदिग्ध व्हावी अशा रीतीने तिच्या अलंकाराची योजना केलेली असे. इस्लामी काव्य ज्याप्रमाणे त्याच्या मूळच्या अभिजात साहित्यशास्त्रापासून दूर सरकले त्याप्रमाणे इस्लामीकलाही तिच्या मूळच्या अभिजात प्रेरणेपासून दूर सरकली.

(अपूर्ण)

⊙ ⊙ ⊙

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

§इस्लामी संस्कृतीची रूपरेखा – ३

कौशिक

ईश्वराच्या अंतिम निवाड्यासाठी माणसाची तयारी करून घेण्याचे स्थळ म्हणजे हे जग. जगाचे एवढेच प्रयोजन आहे. ते निश्चितपणे संपुष्टात येणार आहे. अखेरच्या हिशोबाचा दिवस जवळ आला आहे हे माणसांना सांगणाऱ्या खाणाखुणा कोणत्या हे प्रलया-विषयीच्या अनेक परंपरांतून प्रकट झाले आहे. इतिहास हा तुलनेने लघु कालखंडापुरता मर्यादित आहे. तो आतापर्यंत जसा उलगडत आला आहे तसे त्याचे कथन करायचे तर ह्या कहाणीचा प्रारंभ जगाच्या निर्मिती-पासून करावा लागेल; वेगवेगळ्या जमातींना त्यांच्या, त्यांच्या प्रेषितांकरवी ईश्वराने जी गूढ सत्ये प्रकट केली ती नमूद करावी लागतील आणि ईश्वराच्या कृपा-प्रसादाच्या किंवा क्रोधाच्या छायेत ज्या राजांचा आणि साम्राज्यांचा उदय आणि अस्त झाला त्यांची हकीकत सांगावी लागेल. महंमद पैगंबरांपासून जगाच्या इति-हासाच्या शेवटल्या पर्वाला प्रारंभ झाला आहे. इति-हासाची नांदी संपायला आता फार वेळ नाही आणि मग चिरंतनाचे अधिराज्य (स्वर्गवास किंवा नरकवास) सुरू होईल. जगाची निर्मिती आणि निवाड्याचा दिवस ह्या दोन अलौकिक– इतिहासाच्या सीमा आखणाऱ्या घटना आहेत. माणसाच्या जीवनाचा इतिहास हा ह्या सीमित काळात घडणारा प्रसंग आहे. त्याचे कारण ईश्वराच्या प्रकृतीत किंवा त्याच्या इच्छेत दडलेले आहे आणि ते माणसाला अनाकलनीय आहे. पण ज्या घट-नांनी हा मानवी इतिहास बनलेला असतो त्यांच्या-विषयी मुसलमानांना खूपच कुतूहल असते. माणसे जी कृत्ये करतात ती न्याहाळण्यात ते गुंग होऊन जातात आणि ती आस्थेने आणि बिनचूकपणे नमूद करून ठेवायला त्यांना आवडते. ह्यामुळे इस्लामी संस्कृतीत अशा ऐतिहासिक कागदपत्रांचा अमाप संग्रह उपलब्ध आहे. पण हे ऐतिहासिक कथन व्यक्तींच्या कृत्यांच्या कहाण्यांच्या स्वरूपाचे आहे. इतिहासाच्या ओघाला दिशा आणि गती देणाऱ्या दडलेल्या कारणांचा शोध घेण्याचा, ऐतिहासिक शक्तींचे समालोचन, विश्लेषण करून त्यांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न त्यात नाही. राज्याची वाढ आणि विघटन ज्या शक्तींमुळे होते त्या कशा कार्य करतात ह्याचे एक खोल आकलन येथे आढळते. पण त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमीकडे किंवा ज्या कारणांमुळे भिन्न विचारप्रणाली समूहांना आवाहन करू शकतात त्यांच्याकडे अधूनमधूनच लक्ष दिलेले आढळते. ज्याला इतिहासाचे तत्त्वज्ञान किंवा तत्त्वज्ञानात्मक इतिहास म्हणता येईल त्याच्या अस्तित्वाच्या काही खुणा पुसट आणि अनिश्चित स्वरूपात आढळतात. पण राज्याच्या स्वरूपाविषयीच्या उपपत्तीविषयी तीव्र जिज्ञासा दिसून येते. अधिक नेमकेपणे बोलायचे तर शासनव्यवस्थेचे पद्धतशीर वर्णन करण्यात आणि ज्या आदर्शांवर आणि साध्यांवर शासनव्यवस्था आधारलेली असते त्यांचे विवेचन व समर्थन करण्यात मुस्लिम मनाला रस आहे. शासनव्यवस्थेचे पद्धतशीर वर्णन हा मुस्लिम दृष्टीने राज्यशास्त्राचा विषय आहे आणि तिला आधारभूत असलेल्या आदर्शांचे विवेचन हा राज्यविषयक उप-पत्तीचा (पोलिटिकल थिअरी) विषय आहे असे म्हणता येईल. पण राज्यघटनांचा तौलनिक अभ्यास किंवा राज्यसंस्था ह्या संकल्पनेची चिकित्सा इस्लाममध्ये आढळत नाही. इस्लामी संस्कृतीबाहेर राज्यपद्धतीची आणि राजकीय जीवनाची जी विविध रूपे विकसित झाली त्यांच्याविषयी इस्लामला पूर्ण अनास्था आहे. मुस्लिम राज्याच्या कार्यांच्या वर्णनातही न्यायदान-पद्धतीच्या किंवा राज्यकारभाराच्या तपशीलाच्या वर्णनाचा भाग सर्वांत समाधानकारक असतो. खलिफांचे जे स्थान आणि कार्य आहे त्याचे विवेचन करताना

§ या लेखाचे पहिले दोन भाग अनुक्रमे सप्टें.-ऑक्टो. १९८७ व डिसें. १९८७ या अंकांत प्रसिद्ध झाले. ह्या तिसरा व अंतिम भाग. –संपादक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आदर्श आणि जमिनीवरची वस्तुस्थिती यांचा मेळ घालायला लेखकाला जे प्रयास करावे लागतात त्यांची कल्पना येते. खलिफाची नेमणूक आणि कार्ये ह्यांच्या संबंधीची अपरिवर्तनीय तत्त्वे मुस्लिम कायद्यात घालून दिली आहेत. पुढे श्रद्धावानांच्या (मुसलमानांच्या) ह्या धुरीणाला आपली अगदी प्राथमिक, साधी कार्ये पार पाडायलाही अडचणी येतील ह्याचे पूर्वदर्शन कायद्याला नाही. तेव्हा कायद्यातील तत्त्वांना तडजोड करावी लागते. उदा., खलिफा हा निवडलेला असतो. पण निवडणुकीची संकल्पना ताणून एकमेव पात्र अशा व्यक्तीने केलेली निवड ही निवडणूक असते असे मानावे लागते. म्हणजे पूर्वीच्या खलिफाने नंतरच्या खलिफाच्या केलेल्या नेमणुकीला किंवा राज्याचे नियंत्रण करणाऱ्या लष्करी अधिकाऱ्याने केलेल्या नेमणुकीला मान्यता द्यावी लागते. मुसलमान जमातीमध्ये एकाच वेळेला अनेक धुरीण (खलिफा) असतील ही शक्यताही स्वीकारावी लागते. इतर काळात आणि इतर संस्कृतीत जे घडले ते इस्लाममध्येही घडले. सत्तेविषयीच्या उपपत्तीचा सत्तासंपादनाचे साधन म्हणून वापर करण्यात आला.

या संदर्भात इब्न खल्दून (मृ. १४०६) ह्या विचारवंताचा ‘सार्विक इतिहास’ (युनिव्हर्सल हिस्टरी) हा ग्रंथ लक्षणीय आहे. इब्न खल्दून हा मुत्सद्दी, न्यायाधीश आणि इतिहासकार होता. इस्लामी तत्त्वज्ञानाच्या बहराचा जो कालखंड आहे त्याच्या अखेरीस ह्या ग्रंथाची रचना झाल्यामुळे त्याचा प्रभाव इस्लामी विचारावर पडला नाही. पण स्पेनमधील मुस्लिम राजवट कोसळण्यापूर्वी आणि उत्तर आफ्रिकेतील इस्लामी बौद्धिक संस्कृतीचा विनाश होण्यापूर्वी तो रचला गेल्यामुळे ह्या राजवटीने प्राप्त करून दिलेल्या राजकीय आणि सांस्कृतिक अनुभवाचा लाभ त्याला झाला आहे. इब्न खल्दूनने इतिहासाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या ‘सार्विक इतिहासा’साठी त्याने लिहिलेला उपोद्घात प्रसिद्ध आहे. त्याच्या प्रारंभी इतिहास ह्या विषयाचे त्याने केलेले वर्णन असे आहे: इतिहासाचे ज्ञान एका लोकसमूहाकडून दुसऱ्या लोकसमूहाकडे आणि एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे संक्रांत होत जाते. सामान्यांतल्या सामान्य माणसाला इतिहासाचे आकर्षण असते आणि राजेरजवाडे उत्सुकतेने ऐतिहासिक ज्ञान मिळवायचा प्रयत्न करीत असतात. साक्षर आणि निरक्षर असे दोघेही इतिहासात रंगतात. पूर्वीच्या शतकात आणि साम्राज्यात जे घडले असेल त्याचा माग काढणे हे इतिहासाचे बाह्य रूप आहे. लोकजीवनात जी परिवर्तने घडली आणि वेगवेगळ्या राष्ट्रांनी, जगाच्या रंगभूमीवरून निर्याण करण्यापूर्वी, जी कृत्ये केली त्यांची कहाणी सांगून इतिहास लोकांना रिझवतो. पण पुराव्याची चिकित्सा करून खरोखर काय घडले होते ह्याचा निर्णय करणे, जे घडले असेल त्याच्या कारणांची काटेकोरपणे मीमांसा करणे, घटना कशा घडत गेल्या, त्यांचा उगम कशात होता ह्याचे सखोल ज्ञान प्राप्त करून घेणे हे इतिहासाचे सार आहे. तेव्हा इतिहास ही तत्त्वज्ञानाची महत्त्वाची शाखा आहे.

पुराव्याची शहानिशा करताना जे तत्त्व मार्गदर्शक म्हणून इब्न खल्दून स्वीकारतो ते असे की वर्तमानाच्या आपल्या अनुभवाने आपण भूतकाळ मापला पाहिजे. जे घडणे अशक्य आहे असे आजचा अनुभव सांगतो त्या घटना भूतकाळात घडल्या असतील असे मानता कामा नये. ह्या तत्त्वाचा आधार घेऊन इब्न खल्दून ‘राज्य’ ह्या संस्थेचे आमूलाग्र विश्लेषण करतो. ह्या विश्लेषणात मानसिक आणि ऐतिहासिक ह्या दोन्ही प्रकारच्या घटकांवर तो सारखाच भर देतो. राज्याचे किंवा साम्राज्याचे जीवनचक्र त्याच्या मते असे असते: भटक्या, आक्रमक जमाती स्थिर राज्य जिंकून घेतात, मग त्याही स्थिर होतात, नगरात निवास करतात, नागर जीवनाने त्या हळूहळू भ्रष्ट होतात, मग त्यांची अवनती होते आणि त्यांच्यापासून सत्ता हिसकावून घेण्यात येते. चक्र पूर्ण होते. संस्कृती नागर जीवनावर आधारलेली असते पण नागर जीवन हे अधोगतीचे कारण असते. अधिक चांगल्या जीवनाच्या लोभाने रानटी, भटक्या जमातींच्या नव्या लाटा नगरावर येऊन थडकतात, त्या सुसंस्कृत बनतात, त्यांची प्रारंभीची दृढ ऐक्यभावना शिथिल होते, त्यांचे संघटन दुबळे बनते आणि त्यांच्या सामर्थ्याचे भौतिक अधिष्ठानही झिजून जाते. तीन किंवा चार पिढ्यांत चक्राची एक फेरी पुरी होते.

हा सिद्धांत धर्मनिरपेक्ष आहे. पण मानवी समाजात प्रेषितांना एक विशिष्ट स्थान आणि भूमिका असते हे मान्य करून इब्न खल्दून ह्या सिद्धांताचे इस्लामीकरण करतो. माणूस इतिहासाच्या प्रक्रियेत गोवलेला असतो खरा पण आपले तारण (सॅल्व्हेशन) किंवा मुक्ती साध-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

ण्याचा प्रयत्न करीत असतो आणि ह्याचा त्याच्या समाजाच्या भवितव्याशी काही संबंध नसतो. ईश्वर आणि त्याने निर्मिलेले जीवात्मे ह्यांच्यामध्ये प्रेषित हा दुवा असतो. प्रेषितांचा माध्यम म्हणून उपयोग करून ईश्वर जीवात्म्यांपर्यंत पोहोचतो; प्रेषितांनी माणसांचे सर्वोत्तम कल्याण कशात असते ह्याचा त्यांना उपदेश करावा, ईश्वराचे मार्गदर्शन स्वीकारून नरकातील भयानक अग्नीपासून स्वतःचा बचाव करायला आणि स्वतःचे तारण साधायला त्यांना प्रोत्साहन द्यावे यासाठी त्यांचा ईश्वर वापर करतो. एकाच प्रेषिताने प्रकट केलेल्या सत्यावर निष्ठा ठेवणाऱ्यांमध्ये धार्मिक बंध निर्माण होतो आणि त्यांतून बंधुत्वाची अत्यंत प्रबळ अशी भावना विकसित होते. तेव्हा धार्मिक प्रेरणेने एकवटलेले, आक्रमक प्रवृत्तीचे समूह साम्राज्यस्थापनेच्या चक्रात सहभाग घ्यायला प्रवृत्त होतील आणि त्यात यशस्वी ठरतील अशी जास्त शक्यता असते.

ईश्वर प्रेषितांकरवी अंतिम सत्ये प्रकट करतो हा सिद्धांत स्वीकारल्यानंतर मुस्लिम तत्त्ववेत्त्याला एक जबाबदारी स्वीकारणे भाग पडत असे. एक तर माणसाच्या नैसर्गिक विवेकशक्तीच्या आधारे प्रकट झालेल्या सिद्धांतांचे समर्थन त्याला करावे लागे. किंवा विवेकशक्ती जे ज्ञान उपलब्ध करून देते त्याचे, कुराणात प्रकट झालेल्या सत्यांचा निकष लावून, मूल्यमापन त्याला करावे लागे. ज्ञानाच्या ह्या दोन साधनांची परस्परांशी तुलना करून ती एकमेकांशी कशी सुसंगत आहेत किंवा एकमेकांना कशी पूरक आहेत हे दाखवून देण्यात आपली धार्मिक श्रद्धा व्यक्त होते असे तत्त्ववेत्त्याला वाटणे शक्य आहे. पण प्रत्यक्षात ह्या स्वरूपाच्या प्रयत्नाने ईश्वरी प्रकटनाच्या स्वायत्ततेवर आक्रमण होत असते. शिवाय ह्या प्रकारच्या प्रयत्नांत माणसाच्या एका शक्तीला–विवेकशक्तीला–प्राधान्य मिळत असल्यामुळे, त्यांच्या मागचा दृष्टिकोण मानवकेंद्री ठरतो; तो ईश्वरकेंद्री राहात नाही. जरी प्रकटनापासून लाभणारी सत्ये आणि विवेकापासून लाभणारी सत्ये अशी दोन स्वतंत्र सत्ये आहेत असे मानण्याचे तत्त्ववेत्त्याने नाकारले तरी प्रकटनाचे विवेकशक्तीच्या निकषावर मूल्यमापन करण्यातच मानवकेंद्री दृष्टिकोण अभिप्रेत आहे. इब्न तुफेल (मृ. ११८५) ह्या तत्त्ववेत्त्याने लिहिलेल्या 'हय्य बिन यक्झान' (जागृताचा पुत्र जीवित याची कथा) ही कथा ह्या संदर्भात लक्षणीय आहे. (इब्न तुफेल हा इब्न रशीद (मृ. ११९८) ह्या प्रसिद्ध तत्त्ववेत्त्याचा समकालीन आणि देशबांधव होता.) ह्या कथेचे तात्पर्य असे आहे की एकट्या, एकांतात राहणाऱ्या माणसाने आपल्या भोवतालच्या जगाचे 'तत्त्वज्ञानात्मक दृष्टीने' अवलोकन केले तर ईश्वरी प्रकटनाने ज्या अंतिम सत्यांची ग्वाही दिलेली आहे ती सत्ये केवळ तर्कशक्तीच्या बळावर तो प्राप्त करून घेऊ शकतो. पण ह्यामुळे ईश्वरी प्रकटन मानवी पातळीइतके खाली उतरते. आणि ही भूमिका स्वीकारण्यात मानवी शक्तीविषयीचा जो आत्मविश्वास आणि अभिमान व्यक्त झाला आहे तो धर्मशास्त्रज्ञांना मान्य झाला नसता. मानवी अनुभवाचे केवळ तर्कबुद्धीने आलोडन केल्याने जी सत्ये उपलब्ध होतात त्यांची सुसूत्र व्यवस्था लावणे आणि त्यांना प्रामाण्य देणे हे प्रकटनाचे प्रयोजन आहे असे मानले तर प्रकटनातील बऱ्याच आशयाला काही अर्थ राहणार नाही. उदा., कुराणात कायद्याविषयीची वचने आहेत, अनेक ऐतिहासिक कथा आहेत, अनेक प्रासंगिक उद्गार आहेत. प्रकटनाविषयीचा वरील दृष्टिकोण स्वीकारला तर कुराणाच्या ह्या भागांना काही महत्त्व राहणार नाही. पण सर्वसाधारण समाज कुराणातील ह्या व्यावहारिक तपशीलावर तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने त्याला महत्त्व नसले तरी अवलंबून असतो. तेव्हा बहुजनसमाजाशी संघर्ष टाळायचा असेल तर तत्त्वज्ञान हे काही मोजक्या, अधिकारी साधकांपुरते मर्यादित असते असे मानणे भाग पडते. निर्जन बेटावर आयुष्य व्यतीत केलेल्या हय्याचा, त्याच्या जीवनाच्या अखेरच्या पर्वात, शेजारच्या राज्याच्या वझीराला शोध लागतो. तेव्हा शुद्ध धार्मिक श्रद्धेचा उपदेश लोकांना करण्यासाठी म्हणून हय्या त्या राज्यात जातो. पण थोड्याच काळानंतर तो आपल्या बेटावर परततो. बहुजनसमाजाला शुद्ध श्रद्धा नको असते, इंद्रियसंवेदनांच्या माध्यमातून लोभसवाणी केलेली श्रद्धा त्याला हवी असते हे त्याला उमगते. हय्याची जीवनकहाणी हे इब्न सिनाच्या (मृ. १०३७) एका कल्पनेचे विवरण आहे. डीफोच्या रॉबिन्सन क्रूसोच्या कथेचा उगम बहुधा ह्या कहाणीत आहे. ही कहाणी म्हणजे मध्ययुग संपत येत असताना मुस्लिम संस्कृतीची जी अवस्था होती तिचे प्रतीक आहे असे म्हणता येईल. तत्त्वज्ञानाचा विकास होत होता, त्याचा आवाका खूपच वाढला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

होता. पण हे इस्लामी तत्त्वज्ञान स्वतःच्या समाजातच निष्प्रभ ठरत होते. इस्लामचे मूलभूत सिद्धांत हळूहळू हटत जातील ह्या आशंकेने सनातनी इस्लाम ताठर आणि संकुचित बनत होता. सनातनी वृत्तीचे पुनरुत्थान होत होते आणि सनातनी इस्लामविषयीची आस्था बळकट होत होती. ह्या प्रसरणशील इस्लामी सनातनवादात तत्त्ववेत्त्यांचे गट सापडले होते. त्यांची संख्या घटत होती. त्यांना सापडलेली रहस्ये, विशेषतः इब्न रशीदने ॲरिस्टॉटलच्या सिद्धांतांवर केलेली भाष्ये भाषांतराद्वारा युरोपला उपलब्ध होत होती. पण इस्लामी देशांत हे ज्ञान दुर्लक्षित राहिले. ते जवळजवळ विस्मरणाच्या पडद्याआड गेले.

मानवी व्यक्तित्व अनेक रूपे धारण करू शकते आणि त्या त्या रूपाचा आविष्कार एका विशिष्ट जीवनसरणीत होतो. प्रत्येक संस्कृती आणि प्रत्येक युग माणसांचे हे जे विविध प्रकार शक्य असतात त्यांतील काही प्रकारांना अनुकूल असते आणि त्यांच्या विकासासाठी आणि साफल्यासाठी भरपूर साधनसामग्री उपलब्ध करून देते. पण मानवतेच्या इतर प्रकारांना ही साधनसामग्री ते नाकारते आणि अशा माणसांच्या ज्या विशिष्ट शक्ती कुवती, प्रवृत्ती असतात त्यांच्या आविष्काराला रूढ सामाजिक पठडीमध्ये अर्थपूर्ण असे स्थान लाभू शकत नाही. प्राचीन ग्रीसमध्ये नियमित व्यायामाने आणि सरावाने शरीरसौष्ठव आणि असाधारण शारीरिक कुवती संपादन केलेला मल्ल (ॲथ्‌लीट) आणि वक्तृत्वपूर्ण भाषण करणारा वक्ता ह्या मानव प्रकाराकडे पूज्यभावनेने बघण्यात येत असे. इस्लामी संस्कृतीत त्यांना स्थान नव्हते. रोमँटिसिझमच्या कालखंडात शेतकऱ्याचे आदर्शीकरण करण्यात आले. जी खरीखुरी अकृत्रिम जनसंस्कृती असते तिचा शेतकरी वाहक असतो अशी त्याच्याकडे पाहण्याची दृष्टी होती. इस्लामी संस्कृतीत शेतकऱ्याला हीन गणण्यात येते, शेतकरी कधी विद्वानांचे लक्ष वेधून घेत नाही. इस्लाम भटक्या जीवनापेक्षा स्थिर जीवन, जानपद जीवनापेक्षा नागरजीवन पसंत करतो. कारागिराला इस्लामची मान्यता आहे. पण व्यापाऱ्याविषयी इस्लामला आदर आहे. लेखणीच्या तुलनेने तलवार कनिष्ठ ठरते. संपत्तीपेक्षा धार्मिक ज्ञान अधिक स्पृहणीय आहे. कुराण आणि शरियतच्या पंडितांचे गट वगळले तर तार्किक ज्ञानापेक्षा गूढज्ञान श्रेष्ठ मानले जाते. मानवप्रकारांचा सोपान घेतला तर त्यात सर्वोच्च स्थानी असलेला प्रेषित, नंतर गूढवादी संत, साक्षात्कारी साधन, देहदंड करणारा साधू (सामान्यपणे ह्या इंद्रियदमनात वैयक्तिक सुख त्याज्य मानले जात नाही) ह्या मानवप्रकारांना आणि दुसऱ्या बाजूला विद्वान्, धर्मशास्त्रज्ञ आणि साहित्यिक ह्या प्रकारांना इस्लाममध्ये प्रोत्साहन मिळते. सत्तेविषयीचे एक प्रबळ आकर्षण आहे आणि तिच्याविषयी भीती आणि आदर अशी मिश्र भावनाही आहे. पण सत्ता चंचल असते असा विचारही आहे. समाज शांतताप्रिय असतो, सर्व आपापल्या उद्योगात रमलेले असतात पण ही घडी विसकटायला सुलतान आणि त्याचे अधिकारी कारणीभूत होतात, त्यांच्यामुळे युद्धे माजतात आणि पिळणूक होते.

म्हणून सत्ताधाऱ्यांकडे पाहण्याची वृत्ती संशयाची असते. खलीफा उमर (६३४–४४) यांनी बसरा येथील आपल्या प्रमुख अधिकाऱ्याला पाठविलेल्या पत्राच्या प्रारंभी पुढील वाक्ये आढळतात, "लोकांना आपल्यावर सत्ता गाजविणाऱ्यांविषयी तिटकारा असतो. ह्या भावनेचे लोकांना आपल्याविषयी वाटणाऱ्या द्वेषाचे तुम्ही आणि मी, अचानक आणि अनपेक्षितपणे बळी ठरणार नाही, अल्ला असे होऊ देणार नाही असा विश्वास मला वाटतो." एक कार्यकारी अधिकारी म्हणून सत्ताधारी अनियंत्रित असे. त्याच्या सत्तेच्या निरंकुशत्वाला कुणी आव्हान देत नसे. जनमानसात भय निर्माण करणारे सत्ताधारी मुसलमानांना स्वतःसाठी पसंत असत. सत्ताधीशाच्या समोर जाण्याचा प्रसंग आला तेव्हा त्याच्या दर्शनाने आपली भयकुंठित अशी अवस्था झाली अशी कबुली देणे प्रशस्त मानले जात असे. इब्न अत्-तिक्ताका यांनी १३०२ मध्ये लिहिलेल्या एका ग्रंथात असे म्हटले आहे,

"अस्तित्वाच्या प्रकारांची जी श्रेणी आहे तिच्यात प्रेषिताचे कार्य सर्वश्रेष्ठ आहे आणि मानवी उन्नतीची ती सर्वोच्च मर्यादा आहे. त्यानंतर राजाहून अधिक उच्च असे कुणाचेही स्थान नसते. राज्यपद हे दुसरे तिसरे काही नसून ती खुद्द ईश्वराची देणगी असते राजाच्या अंगी अनन्यसाधारण असे काही गुणधर्म असतात आणि म्हणून तो सामान्य लोकांहून वेगळा ठरतो. ह्या गुणधर्मांतील एक असा की राजाला जेव्हा एखादी गोष्ट आवडते तेव्हा ती इतरांनाही आवडते आणि राजाला जेव्हा एखाद्या गोष्टीविषयी नावड असते तेव्हा इतरांनाही तिच्या-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

विषयी स्वाभाविकपणे नावड निर्माण होते किंवा त्याची मर्जी संपादन करण्यासाठी ती आपल्याला आवडत नाही असा आव ते आणतात ह्यामुळे असे म्हटले जाते की, 'लोक राजाचा जो धर्म असेल त्याचे अनुयायी बनतात.' केवळ राजाच्या ठिकाणी आढळणारा दुसरा गुण असा की एखाद्या माणसाविषयी जेव्हा तो तिटकारा व्यक्त करतो तेव्हा राजाने त्याचे काहीही वाईट केले नसले तरी तो माणूस हाय खातो; आणि जेव्हा राजा एखाद्या माणसाला अनुकूल असतो तेव्हा राजाकडून त्याचा काही लाभ झाला नसला तरी तो माणूस उत्साही बनतो. केवळ प्रतिकूलता आणि अनुकूलता यांच्या योगे ह्या गोष्टी घडून येतात. हा केवळ सत्ताधीशाच्या अंगी असणारा गुण असतो.

खलिफा मामून (८१३-३३) ह्याचे एक वचन असे सांगतात की "सर्वांत चांगले जीवन कुणाचे ? तर ज्याचे एक प्रशस्त घर आहे, ज्याची बायको सुंदर आहे. ज्याच्याकडे पुरेसा पैसा आहे आणि जो आम्हाला (खलिफाला) ओळखीत नाही आणि ज्याला आम्ही ओळखीत नाही त्याचे."

ग्रीक नगरात आणि रेनेसान्सनंतरच्या युरोपिअन समाजात 'नागरिक' ही जी संकल्पना आहे त्या अर्थाने मध्ययुगीन मुसलमान हा नागरिक नव्हता. सत्तेत ज्या उलथापालथी होत त्यांच्याशी त्याचे काही सोयरसुतक नसे. जेव्हा इस्लामी राज्य आणि काफीर यांच्यात युद्ध होई तेवढ्यापुरता राजकीय घडामोडींशी आपला संबंध आहे असे त्याला वाटे. शरियतप्रमाणे सत्ताधाऱ्यांविषयीची आणि इतर माणसांविषयीची आपली कर्तव्ये पार पाडली की मग सामाजिक व्यवस्थेत किंवा नागर व्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्याची आपली काही जबाबदारी आहे असे तो मानीत नसे. पण राज्यकर्त्यांच्या बाबतीत तो अनेकदा अधीर, असहिष्णू असे आणि बंड करण्याचे त्याला काही वाटत नसे. एवढी गोष्ट सोडली तर राज्यकर्त्यांना आपले सत्तेचे खेळ खेळण्याची पूर्ण मुभा तो देत असे. फ्लेव्हिअन्स ह्या रोमन सम्राटाच्या कारकीर्दीत (इ. स. ७०-९५) आपोलोनियस ह्या पंडितावर, तो तरुणांना निवृत्त जीवन जगायला प्रवृत्त करतो असा आरोप करण्यात आला होता. पुढे ख्रिश्चनांना ह्याच स्वरूपाचा दोष देण्यात येत असे. पण नगराच्या जीवनात ते सहभाग घेत नाहीत आणि म्हणून नगराविषयी जी आत्मीयतेची, निष्ठेची भावना असली पाहिजे तिला ते दुबळी करतात ह्या स्वरूपाची टीका कुणाही मुसलमानावर कधी करण्यात आलेली नाही. अशी नागर-भावना विकसित करण्याचा प्रयत्न कुणाही इस्लामी सरकारने केलेला नाही. म्हणून मुस्लिम व्यक्ती ज्या राज्याचा योगायोगाने घटक असे त्याच्याविषयी किंवा कोणत्याही विशिष्ट राजवटीविषयी तिला आपुलकीची भावना नसे. ह्याला अपवाद म्हणजे विशिष्ट पंथीयांच्या राजवटी. व्यक्ती ज्या पंथाची असे त्याच पंथाची जर राजवट कुठे असली तर तिच्याविषयी तिला आत्मीयता वाटे. पण सबंध मुसलमान जमात ही एक आहे. ह्या जमातीला शक्य तितके शरियतच्या अमलाखाली त्याला अनुसरून जगता आले पाहिजे आणि हे साधण्यासाठी केलेला कोणताही राजकीय स्वार्थत्याग योग्य ठरेल ही भावना अत्युत्कट होती. घझली यांनी म्हटले आहे,

"खिलाफत ही संस्था मृत झाली आहे असे काहीजण मानतात. कारण खलिफा होण्यासाठी जी पात्रता आवश्यक आहे ती सबंध कुणाही व्यक्तीच्या अंगी आढळत नाही. पण तिला दुसरा पर्यायही नाही. मग काय ? म्हणून आपण शरियतचे पालन करायचे सोडून द्यायचे का ? काझींना बडतर्फ करायचे, प्रमाण अधिकारी असा कुणी राहिला नाही असे जाहीर करायचे, विवाह करण्याचे सोडून द्यायचे, उच्च स्थानी असलेल्या सर्वांची सर्व कृत्ये अप्रमाण आहेत असे घोषित करायचे आणि लोकांना पापाचरण करायला मोकळे सोडायचे -असे आपण करावे ? की आता आपण जगत आहोत तसेच जगायचे, खिलाफत खरोखर अस्तित्वात आहे हे ओळखून, सरकार आजच्या मूर्त परिस्थितीत, चालू घडीच्या संदर्भात जे काही करीत आहे ते प्रमाणच आहे असे मानायचे ? "

धर्मशास्त्रज्ञ वगळता इतरांचे शिक्षण मुख्यतः साहित्य आणि एकंदर मानव्यविद्या यांच्यावर आधारलेले असे. व्याकरणविषयक, तत्त्वज्ञानात्मक आणि ऐतिहासिक प्रश्नांविषयी शिक्षित समाजात व्यापक कुतूहल असे. प्रसिद्ध कवींमध्ये तुलनेने कोणाचे स्थान वरचे खालचे मानावे ह्याविषयी अटीतटीने वाद होत. जिज्ञासूंना अनेक विद्यांविषयी आस्था असे आणि सर्वच क्षेत्रांत नवीन माहितीची वेगाने भर पडून ज्ञानाचा संचय सतत वाढत असे. ह्यामुळे शास्त्रीय विश्वकोशासाठी 'मागणी होऊ लागली. सुखवस्तू सद्गृहस्थांसाठी वेगळ्या प्रकारचे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

विश्वकोश रचण्यात येऊ लागले. त्यांत वेगवेगळ्या विषयांच्या विवेचनात सामान्य तत्त्वांची उदाहरणे देणारे श्लोक, कथा, आख्यायिका, नीतिवचने इत्यादींचे साहाय्य घेण्यात येत असे. हे विश्वकोश माहिती तर देत पण मनोरंजनही करीत. इब्न कुतैबा (मृ. ८८९) ह्यांनी 'माहितीचे स्रोत्र' ह्या नावाचा रचलेला साहित्यिक विश्वकोश हे अशा रंजक विश्वकोशाचे प्रारंभीचे उदाहरण आहे. ह्या ग्रंथाचे दहा विभाग आहेत आणि ते सरकार व राज्यकारभार, युद्ध, अमीर-उमराव, माणसाच्या नैसर्गिक प्रवृत्ती व स्वभावधर्म, विद्या आणि पंडित, साधना आणि देहदंडन, सामाजिक संबंध, सर्व प्रकारच्या मानवी गरजा, अन्न आणि स्त्रिया ह्या विषयांना वाहिलेले आहेत. आपण इतर काही विषयांवरही पुस्तके लिहिली आहेत असे स्पष्टीकरण त्यांनी दिले आहे. हे विषय म्हणजे पेये, सर्व विज्ञानांतील मूलभूत माहिती, काव्य आणि स्वप्नांची मीमांसा हे होत. आपल्या विश्वकोशाच्या पहिल्या विभागाच्या आशयाचे वर्णन इब्न कुतैबा हचांनी असे केले आहे : "हचात पुढील विषयांचे विवेचन आले आहे : सरकारचे समाजातील स्थान, सरकारच्या संबंधातील भिन्न सामाजिक परिस्थिती, सरकारी कार्यपद्धतीचे प्रकार, राजाची त्याच्या सोबत्याशी चालचर्या कशी असावी, राजाने कसे बोलावे, व्यवहार कसे करावे, सल्ला-मसलत कशी करावी, अधिकारी, न्यायाधीश, चिटणीस आणि सुभेदार यांची निवड करताना राजाने कोणती तत्त्वे पाळली असता राजाच्या धोरणाला अनुसरून हे सेवक आपापले निर्णय घेतील. हचाशिवाय विवेचनाच्या संदर्भात उचित ठरतील अशी अनेक सुभाषिते आणि श्लोक त्यात उद्धृत केले आहेत." हा सबंध ग्रंथ आपण रचला तो विद्वानांचे डोळे उघडण्यासाठी, माणसांच्या नेत्यांचे आणि हचा नेत्यांच्या अनुयायांचे शिक्षण करण्यासाठी आणि राज्यकारभाराच्या कष्टांनी थकलेल्या आणि रंजीस आलेल्या राजांना जेथे विसावा घेता यावा असे एक स्थळ म्हणून."

जेव्हा सुमारे शंभर वर्षांनंतर इब्न सदन ह्या वझीराने (कारकीर्द : ९८३/४–९८५/६) अबू खय्यान अट् तौहिदी (मृ. १०२३) ह्या मान्यवर साहित्यिकाला रोजची संध्याकाळ आपल्या संगतीत व्यतीत करण्याचे आमंत्रण दिले तेव्हा ते कोणत्या विषयांची चर्चा करीत ? हे विषय असे होते : मानवी जीवनाची स्थिती, आत्म्याचे स्वरूप, महत्त्वाच्या समकालिनांचे स्वभाव, इतर राष्ट्रांच्या तुलनेत अरबांची लक्षणीय स्वभाववैशिष्टचे, राजाला आयव्ययशास्त्र आणि अलंकारशास्त्र ह्या दोघांत अधिक उपयुक्त काय, व्याकरण आणि तर्कशास्त्र ह्यांत अधिक श्रेष्ठ कोणते शास्त्र इ. ते जर नंतरच्या काळात भेटले असते तर गूढवादी तत्त्वज्ञानाला त्यांच्या संभाषणात महत्त्वाचे स्थान लाभले असते.

इस्लामच्या उदयाच्या काळात भोवतालच्या राज्यांचा व साम्राज्यांचा जो व्यूह होता त्याला राजकीय प्रतिसाद देण्याची इस्लामची इच्छा असल्यामुळे हा व्यूह महत्त्वाचा ठरला. ही इच्छा नसती तर इस्लामच्या इतिहासात त्याला काही स्थान राहिले नसते. ह्याचप्रमाणे इस्लामच्या ऱ्हासाच्या काळात रानटी टोळचांच्या स्वाऱ्या आणि सत्ता काबीज करण्याच्या त्यांच्या कारवाया यशस्वी ठरल्या ह्याचे कारण आपल्या मूळच्या राजकीय ध्येयावरील इस्लामची निष्ठा क्षीण झाली होती. मोगल टोळचांनी बगदाद जिंकून शेवटच्या अब्बासीद खलिफाचा वध इ. स. १२५८ मध्ये केला. पण त्याच्या कितीतरी अगोदर खलिफा हा ईश्वराचा विश्वस्त आहे आणि ईश्वराच्या आधिपत्याखाली मुसलमान जमातीला आपले जीवन व्यतीत करता येईल ह्याची ग्वाही तो देतो ही भावना मुसलमानांना आवाहन करीनाशी झाली होती. जेव्हा ऑटोमन तुर्कांनी इस्लामी राज्यकर्त्यांना पदच्युत केले तेव्हा इराणबाहेरील मुसलमान जनतेला ह्या घटनेचे फारसे महत्त्व वाटलेच नाही. हे बहुतेक सत्ताधारी परके होते आणि सत्ताधीश असले तरी त्यांची वृत्ती लुटारू होती. इराणला मात्र तुर्क कधी अंकित करू शकले नाहीत.

इस्लामच्या श्रेष्ठतेच्या काळात ग्रीक तत्त्वज्ञान आणि ग्रीक विज्ञान यांनी सनातनी इस्लामच्या तटबंदीवर आघात केले होते. तत्त्वविचारात आणि निसर्गक्रमाच्या आकलनात जी काही प्रगती होई तिच्यामुळे आणि प्राचीन ग्रीक बौद्धिक संस्कृती आत्मसात करून तिच्यात साठविलेल्या ज्ञानाचा विकास करण्याच्या प्रयत्नांमुळे सनातनी इस्लामपुढे दुहेरी अडचण उभी राही. एक तर केवळ कुराण, शरियत आणि आनुषंगिक शास्त्रे यांचा अभ्यास एवढेच बौद्धिक जीवनाचे साध्य आहे अशी परिस्थिती राहात नसे. काही बौद्धिक शक्ती

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अन्य साध्यांकडे वळत असे. दुसरी अडचण अशी की ह्या ज्ञानात ज्या विचारपद्धती अंतर्भूत होत्या त्यांना अनुसरून सनातनी इस्लामच्या सिद्धांतांचे समर्थन करता येते हे बौद्धिक क्षेत्रातील नेत्यांना दाखवून देण्याची जबाबदारी धर्मपंडितांवर पडत असे.

ह्यात सनातनी धर्मपंडितांना दिलासा देणारी गोष्ट एवढीच होती की ग्रीक विद्यांचा अभ्यास करणारा जो वर्ग होता तो संख्येने लहान होता; आणि मुसलमान जमातीत त्याला काही खरा पाठिंबा नव्हता. पण इस्लाममध्ये जे भिन्न संप्रदाय उदयाला आले ते सर्वसामान्य मुसलमानामध्ये उग्र होत जाणाऱ्या विद्रोही भावनेचे आविष्कार होते. ती जनतेची बंडे होती. आर्थिक ताण, सामाजिक अन्याय आणि इस्लामी सिद्धांत आणि इस्लामपूर्व धार्मिक संकल्पना ह्यांचे संश्लेषण करून वडविण्यात आलेल्या शियापंथीय विचारप्रणालींचे बहुजनसमाजाला होणारे आवाहन ह्यांच्यामुळे ९ व्या शतकाच्या अखेरीस सुन्नी पंथी राज्यकर्त्यांचा एकंदरीत पवित्रा बचावाचाच असे. ११ व्या शतकाच्या अखेरीस सनातनी मुस्लिमांची राजकीय स्थिती संकटग्रस्त झाली होती. सुफी पंथाचा उदय झाला होता. मुसलमान जमातीच्या खऱ्या धार्मिक जीवनाचे प्रतिनिधी आणि भाष्यकार हे स्थान त्यांनी प्राप्त करून घेतले होते आणि त्याला अधिकाधिक मान्यता मिळत होती. ह्यामुळे इस्लामी सनातनवादाची जनमानसावरील भावनिक पकड क्षीण होत होती. इस्लामची धार्मिक मानसिकता, त्याचे धार्मिक जीवनाचे विश्लेषण, माणूस आपल्या प्रकृतीच्या आणि परिस्थितीच्या लावीत असलेल्या अर्थात इस्लामने घातलेली चिरंतन महत्त्वाची भर आणि मुस्लिमाच्या आध्यात्मिक आकांक्षांचे अत्यंत तरल पण मूर्त असे रूप ह्यांचा सुफीवाद हा वाहक बनला होता. ईश्वर आणि माणूस यांच्यात सायुज्यता साधण्याची, परमात्मा आणि जीवात्मा यांचे उन्मनी अवस्थेमध्ये ऐक्य अनुभवण्याची सुफीवादामध्ये जी प्रवृत्ती होती तिच्यामुळे द्वैतवादी इस्लामपुढे एक संकट उभे राहिलेच होते. शिवाय सुफीवादामुळे इस्लामला आणखी एक धोका निर्माण झाला होता सर्व जीवनाचे नियमन करणाऱ्या इस्लामी धार्मिक कायद्याला आध्यात्मिक जीवनात स्थान नाही हा संदेश सुफीवादामध्ये गर्भित होता. ईश्वर-जीवात्मा यांचे ऐक्य साधायला जर ह्या कायद्याचे पालन आवश्यक नसेल तर हे ऐक्य साधलेल्याने त्याचे नंतर तरी पालन का करावे ? मुसलमानांमध्ये राजकीय जीवनाविषयी जी अनास्था होती ती सुफी गूढवादाच्या निवृत्तिपर शिकवणीमुळे दृढ झाली. सुफी गूढवाद हा खरा इस्लामी धर्म ठरला. राजकीय जीवनात सहभाग घेण्याविषयी, नागरिकाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या ह्यांचे पालन करण्यासाठी जे शिक्षण आवश्यक असते त्याच्याविषयी अरुची असणे ह्या गोष्टींपासून परावृत्त होणे योग्य आहे ही ह्या गूढवादाची शिकवण होती. सुफी पंथाने ज्या मानवतावादाचा प्रचार केला तोही सदोष होता कारण त्याच्यात कृतीला स्थान नव्हते. राजकीय जीवनाविषयीची अनास्था आणि निष्क्रिय मानवतावाद ही इस्लामी संस्कृतीच्या ऱ्हासाची सर्वांत महत्त्वाची कारणे होत.

पण अखेरीस सनातनी इस्लामने ह्या पेचप्रसंगावर मात केली. क्रुसेड्सनंतर फुटीर धार्मिक संप्रदायांची वाढ होण्याचे थांबले. इजिप्तमध्ये दोन शतकांनंतर आय्युविद घराण्याने पहिली सुन्नी राजवट स्थापन केली (इ. स. ११७१). इराण हे धार्मिक फुटीरतावादाचे आगर होते पण अरबीभाषिक प्रदेशापासून तो राजकीय दृष्टचा वेगळा झाला. पराजय आणि अन्य संकटे यांच्यामुळे सर्वसामान्य मुसलमान आपल्या परंपरेच्या अधिक जवळ आले. सनातनी इस्लामचे समर्थन करणारी धर्मग्रंथांची मीमांसापद्धती विकसित झाली. अशी मीमांसा करण्यासाठी ग्रीक तत्त्वज्ञानाचा अवलंब करण्याची गरज उरली नाही. ग्रीक विचारपद्धती, युक्तिवाद इ. ह्या मीमांसेने आत्मसात केले पण ग्रीक तत्त्वज्ञानातील इतर सिद्धांत दुर्लक्षित केले. ह्यामुळे धार्मिक बुद्धिभेद होण्याचे एक कारण नाहीसे झाले. पाखंडीपणाच्या संशयामुळे विज्ञाने ज्ञानाच्या कक्षेपासून दूर सरकली. ह्या सनातनी इस्लामी प्रतिघाताला इस्लामी राज्यकर्त्यांचा पाठिंबा मिळाला. त्यांनी सनातनी शिक्षणव्यवस्थेला साहाय्य करून आणि दडपशाहीचा वापर करून हा प्रतिघात प्रभावी केला. पण हा कालखंड एकंदरीत वांझोटा आणि अवनत होता. पंडितवर्गाचे बौद्धिक जीवन ग्रंथप्रामाण्याच्या चौकटीत बंदिस्त होते. परंपरागत सिद्धांतांना दृढपणे चिकटून राहण्याची त्यांची वृत्ती होती. पण दुसऱ्या टोकाला सर्वसामान्य अशिक्षित मुसलमान जनता अनेक इस्लामपूर्व समजुतींना कवटा-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

ळून राहिली होती, जादूटोण्यांवर विसंबत होती आणि सुफी संतांची पूजा करीत होती. ह्या गोष्टींना पंडित-वर्गाने सामावून घेतले. ११ व्या शतकातील धर्मशास्त्र-ज्ञांनी, विशेषतः घझाली यांनी सनातनी इस्लाममध्ये सुफीवादाला गोवून घेतले. सुफी पंथीयांनी ह्याला प्रति-साद दिला. इस्लामी धार्मिक कायद्याची अवहेलना कर-ण्याचे त्यांनी सोडून दिले आणि आध्यात्मिक साधनेत त्याला स्थान दिले. ईश्वर आणि जीवात्मा यांच्या सायु-ज्यतेचा, इस्लामी द्वैतवादाशी सुसंगत ठरेल असा अर्थ सुफींनी लावला. उलट सनातन्यांनी इस्लामी धार्मिक विधींचा गूढवादी दिशेने अर्थ लावायला सुरुवात केली. सुन्नी इस्लामचे भावनिक जीवन सुफी साधकांमध्ये केंद्रित झाले.

तुर्कांनी इस्लामी प्रदेशावर सोळाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत पूर्ण कबजा मिळविला. मध्यपूर्वेत एक नवीन राजकीय घडी बसली. बहुतेक सर्व इस्लामी प्रदेश युरोपपासून तोडले गेले. भारत आणि युरोप यांच्यामधील व्यापाराची जी मक्तेदारी मुसलमानांकडे होती तिचे महत्त्व नवीन जलमार्गांच्या शोधामुळे कमी झाले होते. ह्यामुळे ज्या आर्थिक अवनतीला सुरुवात झाली तिच्यावर ह्या सुमाराला व्यापाराचे केंद्र भूमध्य-समुद्रापासून अ‍ॅटलांटिक महासागराकडे सरकल्यामुळे शिक्कामोर्तब झाले. इस्लामी प्रदेश झोपी गेल्यासारखे झाले. मूळच्या इस्लामकडे परत जाऊन त्या आधारे इस्लामी समाजाची सुधारणा करू पाहणाऱ्या वहाबी आंदोलनामुळे (१७५० पासून) केवळ ही झोप चाळविली गेली. पुढे नेपोलिअनची इजिप्तवरील स्वारी झाली (१७९८). युरोपने केलेला हा साक्षात आघात होता. त्याचा परिणाम म्हणून इस्लाममध्ये प्रादेशिक राष्ट्रवादांचा उदय झाला. इस्लामी संस्कृती फिरून बदलायला, प्रयोग करायला, धोके पत्करायला तयार झाली–ती फिरून जगू लागली.

⊙ ⊙ ⊙

प्रसिद्ध झाले !

हिंदुधर्माची समीक्षा व सर्वधर्मसमीक्षा (एकत्रित)
(तृतीयावृत्ती) (प्रथमावृत्ती)

लेखक : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

किंमत : ५० रुपये

मिळण्याचे ठिकाण : चिटणीस, प्राज्ञपाठशाळा मंडळ,
३१५ गंगापुरी,
वाई–४१२ ८०३. (जि. सातारा)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई